फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# दारिद्र्य रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी शासनाच्या विविध विभागांनी केलेले प्रयत्न व त्यांची फलश्रुती यांचे सखोल मूल्यमापन

जिल्हा - ठाणे


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,

पुणे - ४११ ००१.


१९९५-९६

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# दारिद्र्य रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी शासनाच्या विविध विभागांनी केलेले प्रयत्न व त्यांची फलश्रुती यांचे सखोल मूल्यमापन

## जिल्हा- ठाणे

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
*महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,*
*पुणे ४११ ००१*

१९९५

# प्रस्तावना

भारतातील जवळजवळ ७० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेती व शेतीशी निगडीत व्यवसायावर चरितार्थासाठी अवलंबून आहे. त्यातूनही आदिवासी जमात ही पूर्णतः शेती, शेतमजूरी, जंगल उत्पादनावर अवलंबून असल्याचे दिसून येते. त्यांचे वास्तव्य ज्या क्षेत्रात आहे, त्या जमीन, डोंगर, दऱ्याखोऱ्याशी त्यांचे अतूट नाते आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील सिंचन व पाणीपुरवठ्याच्या सोईचा विचार केल्यास पुष्कळ सिंचन प्रकल्प, धरण, बंधारे आदिवासी क्षेत्रामध्ये हाती घेण्यात आले आहेत. काही पूर्ण झाले आहेत. तथापि, या सिंचन प्रकल्पातील पाण्याचा वापर मात्र आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीस अत्यल्प प्रमाणात होत असल्याचे आढळून येते, याची प्रमुख कारणे म्हणजे डोंगर दऱ्याखोऱ्यातील आदिवासींचे वास्तव्य हे असण्याची शक्यता आहे. पर्यायाने सिंचन प्रकल्प आदिवासी क्षेत्रात येऊनही आदिवासींना बहुतांश जमीन करण्यासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. परिणामतः पावसाच्या पाण्यावर असणाऱ्या जमिन धारणेपैकी काही जमीन सतत कोरडवाहू म्हणूनच राहते. उर्वरित जमिनीत पिकणाऱ्या अन्नधान्यातून आदिवासी शेतकऱ्यांची वर्षभर गुजराण होऊ शकत नाही व त्यास आर्थिक स्थैर्यही लाभत नाही, ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने त्यावर अनेक उपाययोजना सुरु करण्यात आल्या.त्याचा उहापोह प्रस्तुत मूल्यमापन अहवालात केला आहे. आदिवासींच्या विकासाकडे स्वतंत्रपणे लक्ष देण्याची गरज ओळखून शासनाने 'आदिवासी विकास विभागाची ' स्थापना केली. या विभागामार्फत आदिवासींची शेती सुधारणा, स्वयंरोजगार व तत्सम योजनांना चालना देऊन आदिवासींचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेतील कृषी विभागामार्फत ही आदिवासींसाठी स्वतंत्रपणे कृषी योजनांचे आयोजन केले जाते. या सर्व योजना आदिवासींसाठी अत्यंत कमी खर्चाच्या प्रसंगी १०० टक्के अनुदान तत्वावरही सुरु करण्यात आल्या. त्याचा लाभ आदिवासींही मोठ्या प्रमाणावर घेत आहेत.

प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालामध्ये दारिद्र्य रेषेखालील आदिवासींनी घेतलेल्या लाभाचे परिणाम दर्शविण्यात आले आहेत. शासनाच्या योजना राबविण्याच्या यंत्रणेतील त्रुटींमुळे योजनांची फलनिष्पत्ती काय होते याचाही परिणाम प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालामध्ये घेण्यात आला आहे. योजनांची अंमलबजावणी व त्यासाठी लागणारे कार्यक्षम अधिकाऱ्यांची उपलब्धता व इतर विभागांशी समन्वय या गोष्टीही अत्यंत महत्वाच्या ठरतात.

आदिवासी हा अल्पभूधारक आहे. त्यातूनही त्याची शेती करण्याची पध्दतीही पारंपारिक आहे. सिंचनाखालील आदिवासींचे क्षेत्र केवळ नगण्य आहे. कोरडवाहू जमिनीमध्ये उत्पादन वाढीसाठी योग्य पिके घेण्यासाठी प्रशिक्षण, आधुनिक शेती मशागतीच्या पध्दती, आधुनिक शेती अवजारे, किटकनाशके, खते, यांचा वापर व शेती संबंधित जोडधंदे यांचे मार्गदर्शन

व प्रशिक्षण देण्याची गरज आहे. यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक उन्नती होऊ शकेल. या बरोबरच आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण वाढविणे हे ही तितकेच महत्वाचे आहे.

सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील सौ.मंगल घोडे संशोधन अधिकारी, यांनी श्री.प्रकाश वाणी, उपसंचालक यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. श्रीमती जयश्री गुंड, श्रीम.उज्वला थोरात यांनी त्यांना सहाय्य केले. तसेच अहवालाचे टंकलेखनाचे कामी श्रीम.एस.एस.पारकर, श्री.डी.डी.गायकवाड, यांनी त्यांना सहकार्य केले. तसेच सदरहू अहवालातील माहितीचे पृथःकरण संगणकाव्दारे करण्यासाठी श्री.जे.बी.अवचट, सांख्यिकी सहाय्यक यांनी बहुमोल सहाय्य केले.

तसेच या योजनांची माहिती पुरविण्यासाठी ठाणे जिल्हयातील, डहाणू, तलासरी, वाडा,पालघर, शहापूर, जव्हार, मोखाडा या तालुक्याचे गटविकास अधिकारी, ठाणे जिल्हा नियोजन अधिकारी इ.चे चांगले सहकार्य मिळाले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल एकात्मिक ग्रामीण विकास योजनांची कृषी व संलग्न योजनांची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी ,आदिवासी विकास विभागातील कर्मचारी, आयुक्त, आदिवासी विकास व इतर संबंधितांना उपयोगी पडेल, अशी आशा आहे.

पुणे

दिनांक ३१.८.१९९५

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

अ नु क्र म णि का


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | मूल्यमापन अभ्यासाचा उद्देश व सर्व्हेक्षण पध्दती | ४ |
| ३. | आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजनांचे स्वरुप | ७ |
| ४. | क्षेत्रीय पाहणी अहवाल विवेचन | १९ |
| ५. | निष्कर्षात्मक बाबी | ३८ |
| ६. | सूचना तथा शिफारशी | ४५ |
| | प्रपत्र क्रमांक-१ लाभधारकांसाठी प्रश्नावली | ४८ |
| | प्रपत्र क्रमांक-२ कार्यान्वय अधिकारी यांचेसाठी प्रश्नावली | ५७ |

१:२ राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्राचा विचार केला तर असे दिसून येते की, हे क्षेत्र एकत्रित सलग नसून ते तिन विभागात पसरलेले आहे.

१. पश्चिमेकडील सह्याद्रिचा पट्टा
२. उत्तरेकडील सातपुडयाचा पट्टा
३. पूर्वेकडील गोंडवनाचा पट्टा

राज्यातील बहूतेक आदिवासी समाज सह्याद्रिच्या पट्टयात राहात असून त्यामध्ये ठाणे, रायगड, पुणे, अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यांचा समावेश होतो. सातपुड्याच्या पट्टयात धुळे, जळगांव, अमरावती या जिल्ह्यांचा काही भाग येतो. तर गोंडवन भागात यवतमाळ, नांदेड, नागपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. थोडक्यात राज्याचे आदिवासी उपयोजना क्षेत्र वरील १४ जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहे.

१:३ राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्राची काही ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील.

डोंगराळभाग, जमिनीची प्रत आणि पावसाच्या प्रमाणातील मोठी तफावत ह्यामुळे आदिवासी विभागात पिकांचीयोजना ठिकठिकाणी वेगळी दिसून येते. आदिवासी मोठ्या संखेने डोंगराळ व दुर्गम भागात राहातात. त्यांची शेती करण्याची पध्दती लगतच्या बिगर आदिवासी क्षेत्रापेक्षा जास्त मागासलेली आहे. म्हणूनच आदिवासींच्या शेती करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा घडवून त्यांना बिगर आदिवासी क्षेत्रातील लोकांच्या बरोबरीने आणण्याचे काम फारच महत्वाचे व खडतर स्वरूपाचे आहे. आदिवासींचा जीवनाकडे पाहण्याच्या एकंदर असलेल्या वृत्तीची प्रचिती आपल्याला त्यांच्या नवनवीन तंत्राची उचल करण्याच्या अत्यंत धीम्या गतीकरून येते. याउलट लगतच्या बिगर आदिवासी भागातील शेतकरी तांत्रीकज्ञानाचा उपयोग करून सुधारलेल्या शेती पध्दतीचा अवलंब करीत आहेत. जागरूकतेमुळे सुधारलेल्या शेती पध्दतीच्या अवलंबनाकरीता अनुदान रूपाने मिळणाऱ्या निरनिराळ्या सवलतींचा फायदा कित्येक वर्षापासून मोठया प्रमाणावर घेतलेला आहे. याच सवलतींचा फायदा विचित्र आर्थिक, सामाजिक, व शैक्षणिक मागासलेपणाच्या परिस्थितीमुळे आदिवासी शेतकरी अपेक्षित प्रमाणात घेऊ शकलेले नाहीत. राज्यातील आदिवासी भागातील वैशिष्ठयपूर्ण भौगोलिक परिस्थीतीमुळे तेथील शेतीही तितकिशी फायदेशिर राहिलेली नाही. अशा परिस्थितीत आदिवासी क्षेत्रातील शेती सुधारावयाची असेल तर विविध आव्हानांना सामोरे जावून विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

राज्यातील आदिवासी भागामध्ये एका बाजुला भरपूर पाऊस पडणारा भाग तर दुसऱ्या बाजूला पावसाचे अल्प प्रमाण असे विरोधी चित्र दिसते. सिंचनाच्या नगण्य सोई असल्याने बारमाही उत्पन्न हा शेतकरी घेवू शकत नाही त्यामूळे संपूर्ण शेती सर्वस्वी पावसावरच अवलंबून असल्याचे दिसते. शेती उत्पादन वाढीसाठी जमिनीची सुपिकता वाढवून पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे अगत्याचे आहे. कोरडवाहू शेती तंत्रामध्ये पीकपध्दतीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अन्नधान्य व त्यांचे उत्पन्न वाढीचे उद्दिष्टे डोळ्यसमोर ठेवण्यात आले होते. त्या अनुषंगाने आदिवासी भागातील शेती व शेतकरी यांचेकडे विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला. आदिवासी शेतकऱ्यांना सुधारीत बि - बियाणे, रासायनिक खतांचा वापर, पीक संरक्षण व संवर्धन योजनांची माहिती करून देणे गरजेचे आहे. नविन पध्दतीचा वापर करण्यासाठी तसेच आदिवासी शेतकऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे उपजावू शेती करण्यावर भर देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजनांची आखणी करून अंमलबजावणी केली आहे.

शेती हा राज्यातील आदिवासींचा मुख्य व्यवसाय असून सुमारे ८० टक्के आदिवासी शेतीवीर उपजीविका करीत आहेत. शेती शिवाय इतर विशेष उपजिविकेचे साधन नसलेल्या ह्या समाजातील बहुतांष लोक दारिद्रय रेषे खाली आहेत. अशा दारिद्रय रेषेखाली असलेल्या आदिवासी व बिगर आदिवासी लोकांकरीता त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्याकरीता शासनाने अनेक योजनांची आखणी केली असून अशा सर्व योजना राबविण्याकरीता एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची विस्तृत योजना आखून एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणेची स्थापना केली आहे.

या कार्यक्रमांतर्गत आदिवासी भागात आदिवासी भागात आदिवासींकरीता राबविण्यात आलेल्या विविध योजनांचा अभ्यास करून त्याचा कितपत परिणाम या आदिवासींवर झालेला आहे याची तपासणी करून अहवाल तयार करण्याचे ठरविण्यात आले.

# प्रकरण २ रे

## मूल्यमापन अभ्यासाचा उद्देश व सर्व्हेक्षण पध्दती

२:१ समाजातील विविध घटकांमध्ये आदिवासी समाज हा सर्वात दुर्बल व कमकुवत घटक गणला जातो. तो शैक्षणिक, सामाजीक व आर्थिकदृष्ट्या अतिशय मागासलेला आहे. त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने व त्यास सर्व सामान्यांच्या बरोबर आणण्याचे दृष्टीने शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

२:२ मूल्यमापन अहवालाचे महत्व :- शासनाच्या वेगवेगळ्या उदा. कृषी, वन, ग्रामीण विकास, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, सहकार, आदिवासी विकास व इतरही विभागांमार्फत्त 'वैयक्तिक तथा सामुहिक'लाभाच्या योजनांद्वारे त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्याद्वारे त्यांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेण्यास प्रवृत्त केले जाते.

तथापी आदिवासींना वेगवेगळ्या योजना देऊन त्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे का? त्यांचे जीवनमान सुधारले आहे का ? त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली असल्यास दारिद्रय रेषेच्याखाली किती आदिवासीं होते व वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेवून किती टक्के आदिवासींचे उत्पन्न वाढून त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यात यश मिळाले या सर्व बाबींचा सविस्तर शोध घेण्याचे काम मूल्यमापन अहवालाद्वारे हाती घेण्यात आले आहे. यासाठी खालील प्रमुख उद्दिष्टये नजरेसमोर ठेवण्यात आली आहेत.

२:३ मूल्यमापन अहवालासाठी प्रमुख उद्दिष्टे :-

१. ठाणे जिल्हातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा वरील प्रभाव व परिणाम अजमावणे.

२ . आदिवासी क्षेत्रातील विशिष्ट भौगोलिक परिस्थितीनुसार योजना कार्यक्रमाचे आयोजन आहे किंवा कसे याचा शोध घेणे.

३. एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा कृषी व संलग्नसेवा, आदिवासी विकास विभागा इ. मार्फत्त राबविण्यात आलेल्या योजनांचा लाभ किती आदिवासींना किती प्रमाणात झाला याचा उहापोह करणे.

४. शेती विकास कार्यक्रम राबवितांना येणाऱ्या अडचणी तसेच कार्यक्रमामधील त्रूटी/अडचणी /विसंगती याचा अभ्यास करणे.

५. ह्या अनुषंगाने योजना कार्यक्रमांच्या स्वरूपात सुयोग्य बदल सुचविणे.

तक्ता क्र.२.१

२:४ ठाणे जिल्हयातील क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेली तालुकानिहाय गांवे :-

| अ.क्र. | जव्हार | | डहाणू | | मोखाडा | | तलासरी | | शहापूर | | वाडा | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | |
| १ | दादडे | ६९ | सरावली | १५ | पोशेरा | १८ | उधवा | १५ | शिरोळ | २ | हरसाळ | ८ | |
| २ | शिवाजीनगर | १ | आशागड | ३ | पळसुंदा | १२ | सुत्रकार | ३ | कोठार | २३ | हरसूळ | १ | |
| ३ | कन्हे | १ | चादवड | ७ | मोखाडा | २ | कोदाड | १ | सारंगपुरी | ४ | देवळी | १ | |
| ४ | सुतारपाडा | १ | गंजाड | ११ | | | कुराण | १ | | | सापन खु. | ८ | |
| ५ | वेहलपाडा | १ | रानशेत | ५ | | | | | | | खारीवली | ३ | |
| ६ | वडपाडा | १ | सतोषा | १ | | | | | | | कचाड | ३ | |
| ७ | कगोडी | १ | सारपोली | १ | | | | | | | गोन्हे | १ | |
| ८ | धानोशी | १ | सांगवा | १ | | | | | | | उसरपळस | १ | |
| ९ | विक्रमगड | १ | वाघाडी | १ | | | | | | | | | |
| | एकूण | ७७ | | ४५ | | ३२ | | २० | | २९ | | २६ | २२९ |

२:५ तालुक्यांची व गावांची निवड पध्दती :-

ठाणे जिल्हयामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रात सात तालुक्यांचा समावेश होत असल्याने सातही तालुक्यांची क्षेत्रीय पाहणीसाठी निवड करण्याचे ठरविण्यात आले. वरील सात (७) तालुक्यांच्या सांख्यिकी माहितीवरून व या तालुक्यांमधील गटविकास अधिकाऱ्याशी चर्चा करून या तालुक्यांची निवड केली.

गावांच्या निवडी संबंधी काही निकष निश्चीत करण्यात आले. वरील सात (७) योजनांचा जास्तीत जास्त फायदा देण्यात आलेली गांवे, त्यात रस्त्या लगतची, दुर्गम व अतिदुर्गम भागातील गांवे यांचा समावेश करण्याचे ठरले.

आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी ठाणे जिल्हयात राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा व पर्यायाने लाभार्थींचा समावेश होणाऱ्या योजना निश्चीत करण्यात आल्या.

२:६ लाभार्थी कुटूंबांची निवड :-

ठाणे जिल्हयामध्ये आदिवासींसाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांखालील लाभ घेतलेल्या आदिवासी लाभार्थी कुटूंबांची संख्या विचारात घेता सर्वच्या सर्व कुटूंबांना भेटी देऊन माहिती घेणे वेळेच्या अभावी व क्षेत्रीय पाहणीसाठी लागणाऱ्या कर्मचारी वृंदाच्या अपुरेपणामुळे काही निवडक लाभार्थी कुटूंबांची निवड करून सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करण्याचे ठरविले. त्यानुसार प्रमुख योजनांतर्गत एकूण लाभार्थी व निवडलेले लाभार्थी तक्ता क्र २:१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

२:७ प्रत्येक विकास कार्यक्रम तथा प्रमुख विभागांतर्गत दिलेल्या योजनांचा अभ्यास करून लाभार्थींनी ज्या योजना/कार्यक्रमांचा जास्तीत जास्त फायदा घेतला असेल अशा प्रत्येक योजनेला प्राधान्य देऊन आदिवासी लाभार्थींची क्षेत्रीय पाहणीसाठी निवड करण्यात आली.

२:८ ठाणे जिल्हयातील आदिवासींसाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा लाभ घेतलेल्या आदिवासी कुटूंबाकरीता भरण्यासाठी प्रपत्र क्र.१ तयार करण्यात आले. याशिवाय सदर योजनांची अंमलबजावणी करणारे शासकीय अधिकारी यांचेसाठी प्रपत्र क्र.२ तयार करण्यात आले. त्यामध्ये राबविलेल्या योजनांसंबंधी त्यांचे अभिप्राय तसेच योजनेच्या अंमलबजावणी मधील त्रुटी/अडथळे इत्यादी बाबतची माहिती नोंदवावयाची आहे.

## प्रकरण ३ रे

### आठव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजनांचे स्वरूप :-

३:१ पाटबंधारे व पूरनियंत्रण :-

अ. लघुपाटबंधारे :- शेतीच्या विकासासाठी लघु पाटबंधाऱ्यांच्या लहान लहान योजना या योजनेखाली तयार करून बांधल्या जातात. ज्यांचे मशागत क्षेत्र २५० एकरापेक्षा जास्त आहे. व ५००० एकरापेक्षा कमी आहे अशाच योजना वरील योजनेत राबविल्या जातात.

नवीन प्रकल्प घेण्यापूर्वी प्रथम सर्वेक्षण व अन्वेषण केले जाते. व नंतर तो प्रकल्प आर्थिकदृष्ट्या मापदंडात बसत असल्यास व तो तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्यास शासनाकडून त्यास प्रशासकिय मान्यता दिली जाते.

प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर व त्यास आर्थिक तरतूद मिळाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम या योजनेअंतर्गत केले जाते.

ब. अयशस्वी विहिरींना अनुदान :- जिल्हा कृषि व ग्रामीण विकास बँक व राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा करण्यात येऊन बांधण्यात आलेल्या विहिरींना सिंचनाकरीता पुरेसे पाणी लागले नाही तर अशा विहीरीचे बाबतीत शासनाकडून अनुदान देण्यात येते.

अनुदानाच्या पध्दती १-४-८० च्या अगोदरच्या प्रकरणात स्थगित मुद्दलाच्या २० किंवा ५०% व्याजावर १००% सूट विहीरीचा खर्च ४०००/- रू. गृहित धरून अशी जास्तीत जास्त ४०००/- रू. पर्यंत सूट मिळते. १-४-८० पर्यंत विहिरीचे सरासरी कर्ज ६०००/- रू. गृहीत धरून लहान व आदिवासी शेतकऱ्यांना १००% व १-७-८३ च्या प्रकरणात विहीर खोदण्याचा एकूण खर्चावर १०० % अनुदान मिळते.

३:२ ग्रामीण विकास :-

१. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :- दारिद्रय रेषेखालील असलेल्या सर्व कुटूंबांना रोजगार उपलब्ध करून किंवा त्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देवून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी १९८२-८३ साली जिल्हयातील सर्व गावांमध्ये पाहणी करून दारिद्रय रेषेखाली असलेल्या कुटूंबाची यादी तयार

करण्यात आली. ज्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ६४००/- हून जास्त नाही अथवा ज्यांचेपाशी आवर्षण प्रवण भागाचे बाबतीत ३ हेक्टर पर्यंत व अन्यत्र दोन हेक्टर पर्यंत ओलीताखालील जमीन आहे अशा दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची गणना करण्यात आली.

उत्पन्नाचे साधन उपलबध करून देण्याच्या कार्यक्रमात ग्रामीण भागात चालणाऱ्या धंद्या विषयी मार्गदर्शन करून व अनुदानाच्या रूपात आर्थिक सहाय्य व त्याचबरोबर बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. तसेच ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्याची तरतूद या योजनेखाली आहे. या प्रशिक्षण देण्याच्या योजनेस ट्रायसेम असे संबोधले जाते.

गणना केलेल्या कुटूंबामधील अल्पभूधारक, सिमांतीक शेतकरी, शेतमजूर, बिगर शेतमजूर, ग्रामीण कारागीर, अनु.जाती व जमाती यांच्या कुटूंबांचा लक्षीत गट तयार करण्यात येतो. अल्पभूधारक व सिमांतीक शेतकऱ्यांना विहिर खोदण्यासाठी तसेच जुन्या विहीरी दुरुस्त करण्यासाठी, तसेच त्यावर इलेक्ट्रीक पंप बसविण्यासाठी, तसेच दुभती जनावरे, मेंढरे, बकऱ्या, कोंबडया पाळण्यासाठी, कृषि विषयक अवजारे पुरविण्यासाठी जमीन सपाटीकरण करण्यासाठी वगैरे बाबींकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. अनुदानाचा सर्वसाधारण दर २५% किंवा ३३.३३% असतो. आदिवासी व अनु.जातीच्या लाभार्थींच्या बाबतीत मात्र अनुदान दर ५०% किंवा जास्तीत जास्त ५०००/- रू असा आहे.

ही योजना यशस्वी करण्यासाठी नियामक मंडळ नेमण्यात आले असून त्यांच्या सभा नियमित दर तीन महिन्यांनी घेण्यात येतात. त्यांचे अध्यक्ष मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे आहेत.

२. जवाहर रोजगार योजना:- केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम राबविण्यात येत होता. ८९-९० पासून या योजनेचे जवाहर रोजगार योजनेत रूपांतर करण्यात आले.

या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागांत लाभदायक रोजगार निर्माण करणे व त्यायोगे ग्रामीण भागाचा विकास करणे हा होय. या योजनेसाठी ८०% रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध होते व उरलेली २०% रक्कम राज्य शासनाकडून मंजूर होते. शासनाने एकुण मंजूर केलेल्या तरतूदीतून ६% इंदिरा आवास योजनेसाठी ,५% अस्थापना खर्चासाठी, २०% मागील वर्षाची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी व उरलेली रक्कम नवीन कामांसाठी उपलब्ध करून देण्यात येते.

३. रोजगार हमी योजना :- ग्रामीण भागात राहणाऱ्या व अंगमेहनतीची अकुशल कामे करणाऱ्या मजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा हे प्रमुख उद्दिष्ट लक्षात घेवून व मागेल त्याला काम ह्या तत्वावर १९७२ पासून रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली.

४. जमीन सुधारणा :- महाराष्ट्र शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१ व सुधारित कायदा १९७५ अन्वये जमीन धारण क्षेत्राची मर्यादा ५६ एकरा पर्यंत निश्चित केली असून त्यापेक्षा अधिक धारण क्षेत्र उपरोक्त कायद्यान्वये सरकारच्या ताब्यात घेतले जाते व त्याचे वाटप भूमिहिन शेतमजूर, अनुसूचित जाती जमातीचे भूमिहीन लोक तसेच भूमिहीन आदिवासी यांना शासनाने विहीत केलेल्या वाटप समिती मार्फत्त वाटप केली जाते.

अतिरिक्त घोषित केलेली जमिन वाटप केल्यानंतरची सदरची जमिन लाभधारकांना शेती उपयुक्त मशागत व सुधारणा करणेसाठी वरील योजना राबविली जाते. या योजनेस केंद्र शासनाचे ५०% अनुदान मिळते व तेवढेच अनुदान राज्य शासनाकडून उपलब्ध केले जाते.

हे अर्थ सहाय्य रोख रकमेत न देता वस्तुरूपाने दिले जाते.

महाराष्ट्र कृषि औद्योगीक विकास महामंडळ व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडून शेतीची निरनिराळी अवजारे मागविणेत येतात. व ती अवजारे तहसीलदारांमार्फत्त अतिरिक्त जमिनीचे वाटपगृहींना वाटण्यात येतात. प्रत्येक वाटपगृहारा साधारणपणे रू. २५००/- पर्यंत किंमतीची अवजारे वाटप केले जातात. त्यात पुढील अवजारांचा समावेश असतो :- १. नांगर, २. हँड-स्प्रे-पंप, ३. खुरपणी, ४. टिकाव, ५. फावडा, ६. पहार, ७. कुदळ, ८. केणी (लेव्हरर), ९. घमेली, १०. विळे.

३:३ कृषि व संलग्न सेवा :-

'कृषी व संलग्न सेवा' या विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विभागवार योजनांचे स्वरूप व इतर अनुषंगिक माहिती :-

१. पीक संवर्धन :- विशेष घटक योजना धर्तीवर दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी आदिवासींना विशेष सहाय्य देण्याच्या योजना उसाच्या लागवडीचा समावेश करून या योजनेअंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना खालील योजनांचा लाभ देण्यात येतो.

अ. आदिवासी शेतकऱ्यांसाठी निविष्ठा वाटप : आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन सुधारीत जातीचे बि-बियाणे, खते - यूरिया, सुफला , किटकनाशके, औषधे यांचा पुरवठा केला जातो. (निविष्ठा वाटप मोफत असल्यामुळे) त्याचा लाभ सर्व शेतकऱ्यांना घेता येतो. सर्व निविष्ठाचे वाटप आदिवासी शेतकऱ्यांना मोफत करण्यात येते. सदर निविष्ठासंचामध्ये सुधारीत बि-बियाणे, १० किलो यूरिया, सुफला प्रत्येकी १ गोणी या प्रबाणे वाटप करण्याची तरतूद आहे.

ब. बैलगाडी/बैलजोडी वाटप :- आदिवासी शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी व बिगरशेती कालावधीत वाहतूकीचा धंदा शक्य व्हावा अशा दृष्टिने बैलजोडी अथवा बैलगाडी विकत घेण्याकरिता एकूण किंमतीच्या ५०% रक्कम गरजू शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज म्हणून पुरविण्यात येते.

क. जमीन सपाटीकरण :- आदिवासी भाग मूळचा डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांचा. परिणामत: जमीन उंच सखल असल्याने शेतकऱ्यांना जमिनी सपाट करून देण्याची योजना शासनाने हाती घेतली आहे. या योजनेखाली प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतामध्ये जास्तीत जास्त २० तास बुलडोझरने जमीन सपाट करून दिली जाते. किंवा शेतीचे क्षेत्रनिश्चित ठरवून रू. ४५००/- पर्यंत जमीन सपाटी करण्यासाठी १००% खर्च करण्याची तरतूद शासनाने केली आहे.

ड. तेलबिया उत्पादन कार्यक्रम :- राज्यातील तेलबिया पिकाखालील क्षेत्र व प्रति हेक्टरी उत्पादन वाढविणे व तेलबिया उत्पादनात वाढ करून देश स्वावलंबी बनविणे या कामी गळीत धान्य पिकाखालील क्षेत्रात वाढ करून त्यामध्ये प्रति हेक्टरी उत्पादनात वाढ करणे हा मुळ उद्देश डोळयापुढे ठेवून खालील प्रमाणे योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येतात.

१. पीक संरक्षण योजना :- भूईमूग बीज प्रक्रियाकरिता थायरमसारखी बुरशी नाशके, पाने गुंडाळणारी अळी, मावा, टिक्का, केसाळआळी इ. किडीवर पीक संरक्षण औषधांचा पुरवठा सर्व शेतकऱ्यांना ५०% सवलतीवर वाटप करण्यात येतो.

२. सुधारित शेती अवजारे वाटप :- दोन चाडी पाभर, ओक चाडीचे दोन चाडीत रूपांतर भूईमूग सोलणीयंत्र यामुळे आधुनिक पध्दतीने ठराविक अंतरावर बियाणे व खते ओकाच वेळी पेरता येतात. भूईमूग सोलणी यंत्रामुळे भूईमूग शेंगापासून त्वरीत बियाणे करता येणे शक्य झाले असून फूट कमी होते तसेच मजूर कमी लागून बियाणे चांगले मिळते. या योजनेत सर्व शेतकऱ्यांसाठी ५०% सवलत आहे.

३. पीक संरक्षण आयुधे वाटप :- सदरची पीक संरक्षण अवजारे ही सर्व शेतकऱ्यांसाठी ५०% सवलतीवर शेतकऱ्यांना पुरवठा करता येतात. त्यामुळे औषधे वापराचे तसेच स्प्रे पंपाचा उपयोग जास्त प्रमाणात शेतकरी करू लागले असून वेळीच रोग किडीचे नियंत्रण होत असते.

४. जिप्सम पुरवठा :- सर्व शेतकऱ्याना १००% अनुदानावर जिप्सम पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेंगाची वाढ चांगली होते, दाणे चांगले भरतात. पर्यायाने उत्पादनात वाढ होते.

५. तुषार सिंचन संच :- कमी पाण्यावर खरीप व उन्हाळी हंगामात भूईमुग पिकासाठी तुषार संच वापरून पिकासाठी योग्यवेळी जादा पाण्याच्या पाळ्या देता येणे शक्य झाले आहे. यामध्ये ५ ओकराचे आत जास्तीत जास्त

रूपये ५,००० सवलत व त्यापुढील खातेदारास एकूण किंमतीच्या २५% सवलत मिळत असून त्यामुळे पाण्याचे योग्य प्रमाणे नियोजन होत आहे. खरीप व उन्हाळी हंगामातही पावसावर भूईमूगासारख्या पिकाची लागवडीमध्ये वाढ होत आहे.

२. फलोत्पादन :- फलोत्पादान विकासाच्या विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यामध्ये शेती व सहकार खात्यामार्फत करण्यात येते. फलोत्पादन विकासाच्या विविध योजनांची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र फलोत्पादन संचालनालय स्थापन करण्यात आले. या संचालनालयाच्या आधिपत्याखाली प्रत्येक विभागासाठी अधिक्षक, फलोत्पादन अधिकारी व जिल्हा पातळीवर उपसंचालकांचे कार्यालय आहे. उपसंचालकांचे मदतीसाठी सहकार सांखिकी विभागातील तज्ञ अधिकारी नेमण्यात आले आहेत. तालूका पातळीवर रोपवाटिकेसाठी एक फलोद्यान अधिकारी व किमान अेक माळी असा कर्मचारी वृंद नेमण्यात आला आहे. अशा प्रकारे फळबागा विकासाच्या व फुलझाड लागवडीच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. शेतकऱ्यांशी संपर्क साधून फलोद्यान विकास योजना राबविण्यासाठी फळबाग लागवडीचे महत्व पटवून देणे, झाडांना कलमे करणे/डोळा भरणे, शेतकऱ्यांना बँकामार्फत कर्जपुरवठा करणे इ. कामे तसेच सहकार्य त्या खात्याकडून देण्यात येते. फळझाडे लागवडीचे आदिवासी भागात विशेष महत्व आहे. आदिवासींची डोंगर उतारावरील जमीन, जमीनींचे लहान लहान तुकडे, शेतीसाठी पाण्याचा अभाव, आदिवासी शेतकऱ्यांची हालाखीची आर्थिक स्थिति, शैक्षणिक मागासलेपणा त्यादृष्टिने आर्थिक औद्योगीक व नैसर्गिक फायदा अधिक आहे.

अ. भाजीपाला विकासाकरिता उत्तेजन :- आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन आहारात भाजीपाल्याचा वापर सुलभ व्हावा व गरज भागवून उरलेले भाजीचे उत्पादन जवळच्या बाजारपेठेमध्ये विकून आर्थिक लाभ मिळविता यावा हा या योजनेमागील उद्देशआहे.

सदर योजनेअंतर्गत लहान सीमांतिक व आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या ०.१० हेक्टर क्षेत्ररवर भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी, सुधारीत बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, त्यांच्या निविष्ठा (मिनिकिट्स) विनामुल्य पुरविल्या जातात. सदर निविष्ठांची किंमत रू. १९०/- असून भाजीपाला लागवडीकरिता उत्तेजन मिळावे यासाठी ही योजना राबविण्यात येते.

ब. निरनिराळया फळपिकांचे पुनरूज्जीवन :- जुन्या फळबागांपासून मिळणाऱ्या उत्पादनात घट होत असल्याने अशा जुन्या फळबागांचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारीत मशागत पध्दतीचा अवेलंब करून उत्पादन वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

उत्पादन घटलेल्या शेतकऱ्यांच्या बागांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी निवड करावयाची असून पुनरूज्जीवनाचा खर्च सदर शेतकऱ्याने स्वत: करावयाचा आहे. लहान व जनजाती शेतकऱ्यांना बागांच्या पुनरूज्जीवनासाठी होणाऱ्या

खर्चाचा भार कमी व्हावा म्हणून खर्चाच्या ५०% किंवा दर हेक्टरी कमाल रू. १,०००/- पर्यंत अर्थ सहाय्य देण्यात येते. इतर शेतकऱ्यांना खर्चाच्या ९५% परंतू हेक्टरी जास्तीत जास्त रू. ५००/- पर्यंत अर्थ सहाय्य देण्यात येते. या योजनांचे वैशिष्ठ असेकी सतत ३ वर्षे त्याच प्रक्षेत्रावर ही योजना राबवून उत्पादनात वाढ झाली किंवा कसे याची नोंद घेवून ठरविण्यात येते.

क. गांवठी बोर व अंब्याच्या झाडांचे पुनरूज्जीवन व ग्रामपंचायतींना आंब्याच्या झाडांचे नूतनीकरणासाठी प्रोत्साहन/सहाय्य :- या योजनेखालील आदिवासी शेतकऱ्यांकडील स्वत:च्या मालकीच्या गावठी आंबा किंवा बोराच्या झाडावर बगल कलम अथवा डोळा भरून त्यांचे सुधारीत जातीत रूपांतर करता येते. याशिवाय ज्या अल्पभूधारकांनी स्वत:च्या खर्चाने आपल्या मालकीची आंबा व बोर झाडांचे कलम करून घेतले असेल त्यांना प्रत्येक यशस्वी झाडामागे आंब्यास रू. ५/- तर बोर झाडास रू. ३/- प्रमाणे अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. मात्र यासाठी फलोद्यान विभागास पूर्वसुचना देणे जरूरीचे आहे.

तसेच स्थानिक संस्था म्हणजे ग्रामपंचायत आपल्या हद्दीत किमान ५०० झाडे (आंबा, बोर मिळून) सुधारीत जातीमध्ये रुपांतर करकून जगवून दाखवतील अशा संस्थांपैकी पहिल्या दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहनासाठी अनुक्रमे रू. ३०००/- व रू. २०००/- ची रोख बक्षिसे शासनाने ठेवलेली आहेत.

ड. अल्पभूधारक व सीमांतीक शेतकऱ्यांना फलोद्यान विकासासाठी भांडवली अनुदान :- अल्प व सिमांतीक आदिवासी शेतकऱ्यांकडे पुरेशी भांडवल तरतूद नसल्याने ते फलोत्पादन योजनेपासून वंचित राहतात. अल्पभूधारकांना शेतीपिका व्यतिरिक्त उत्पन्नाचे जोड साधन मिळावे म्हणून अल्पभूधारक व छोट्या शेतकऱ्यांना फळबागा लागवडीला उत्तेजन देण्यासाठी भांडवली अनुदानाची योजना राबविण्यात येते. या योजने अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण कृषी बँकेने( नाबार्ड) अल्पभूधारक शेतकऱ्यांची व्याख्या ठरविताना जमीन धारणामर्यादा शिथील केली आहे. अल्प व सिमांतीक कास्तकारांची जमीन १७.२५ एकर (६.९०) पेक्षा जास्त नसावी. सदर योजनेमध्ये फळझाडे लावण्यासाठी शेतकऱ्यांना भूविकास बँक व राष्ट्रीयकृत बँकेकडून दीर्घ मूदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे १५ वर्षे दिर्घ मुदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे १५ वर्षे मुदतीचे ह्या कर्जाची परतफेड फळ धारणेनंतर ५ ते ७ वर्षात करावी लागते. तसेच अल्पभूधारकांवरील कर्जाचा बोजा हलका व्हावा म्हणून ३३ १/३% अनुदान दिले जाते. हापूस आंब्याच्या लागवडीस ५०% इतके अनुदान देण्यात येते. बँकांनी दरवर्षी किती व कशाप्रकारे टप्प्या टप्प्याने अर्थसहाय्य करावे याचा तपशील निर्धारीत करण्यात आला आहे.

इ. फलोद्यान विकासाच्या घरकुल योजनेसाठी भांडवली अनुदान:- या योजनेखाली फलोद्यान विकास कार्यक्रमासाठी शासनाने ग्रामीण भागात बांधून दिलेल्या घरकुलातील आदिवासी कुटूंबांना त्यांच्या घराभोवती लावण्यासाठी १००% अनुदानावर प्रत्येकी ५ फळझाडांची रोपे/कलमे रोपमळ्यातून दिली जातात.

३. पशुसंवर्धन:- पशुधन विकास आणि पशुधनाचे रोगराईपासून संरक्षण ही पशुसंवर्धन खात्याची प्रमुख कार्ये होत. पशुधनापासून दूध, अंडी, मांस हे अन्नपदार्थ मिळतात. तसेच व्यापारीदृष्टया महत्वाची अशी लोकर, कातडी व हाडे इत्यादी उत्पादनेही मिळतात. वरील प्राणिज पदार्थांचे उत्पादन वाढविण्यासाठी आणिा पशुधनाची हानी कमी करून त्यांची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने खालील पशुसंवर्धनाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

१. शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे :- आदिवासी लाभार्थींना प्रशिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. दुधाची शास्त्रोक्त पध्दतीने हाताळणी, दुभत्या जनावरांचे संगोपन जनावरांचे संगोपन, जनावरांचे रोग व त्यावरील उपचार इ. चे प्रशिक्षण देण्यात येते.

परंतू अशाप्रकारचे प्रशिक्षण ' दुग्धव्यवसाय' विभागामार्फत करण्यात येते.

हे प्रशिक्षण १ ते २ आठवडे या कालावधीचे असते. प्रवासखर्च, राहणे, जेवण इ. खर्च हा या योजनेमार्फत करण्यात येते.

२. पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन :- या योजनेतून आदिवासी सुशिक्षित तरुणांना पशुवैद्यक शास्त्रातील पदवी संपादन करता यावी, म्हणून दरमहा रु. १५०/- विद्यावेतन व इतर खर्चासाठी वर्षाला १२००/- रु. सानुग्रह अनुदान देण्याची सोय आहे. यासाठी १२ वी (शास्त्र) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ही योजना विभागीय उपसंचालक, पशुसंवर्धन विभाग पुणे, मुंबई, नासिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांचे मार्फत राबविण्यात येते. इच्छूकांनी यासाठी प्रथम संबंधीत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हापरिषद यांचेशी संपर्क साधावा लागतो.

३. संकरित कालवडी जोपासण्यासाठी सहाय्य :-

४. विद्यमान पशुवैद्यकिय संस्थांना औषधे पुरविणे :-

५. पशुवैद्यकीय दवाखाना व पशु प्रथमोपचार केंद्र बांधणे :- या कार्यक्रमाखाली (आदिवासी भागातील) सध्या अस्तित्वात असलेल्या पशु वैद्यकीय केंद्राचा दर्जा वाढवून त्यांचे पशुवैद्यकिय दवाखान्यात रुपांतर केले जाते. तसेच या भागात नवीन पशुवैद्यकिय दवाखाने व प्रथमोपचार केंद्र स्थापन केले जातात. पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्राच्या किंवा

दवाखान्यांच्या इमारतींचे बांधकामही करण्यात येते. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या दुर्गम भागातील पशुवैद्यकीय संस्थांना औषधे पुरविली जातात. फिरते पशुवैद्यकीय दवाखाने चालू करण्यात येवून दूरदूरच्या दुर्गम भागात पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते. गाईगुरांचे लाळ, खुरकूत रोगांपासून संरक्षण करण्यासाठी या रोगाच्या लशीचे वाटपही मोफत केले जाते.

६. फिरत्या पशुवैद्यवीय सर्व चिकित्सालयाची स्थापना .

७. पशु प्रथमोपचार केंद्र / आधारभूत ग्रामकेंद्र / कृत्रिमरेतन केंद्राचा दर्जा वाढविणे.

८. तोंडाचे व पायाचे रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी अर्थ सहाय्य.

९. पशुखाद्य वैरण कामासाठी पायाभूत बाबींचे बळकटीकरण करणे.

१०. वळूंचे वाटप :- दुर्गम भागातील जनावरांचा दर्जा सुधारण्यासाठी जातीवंत गोवंशावळीचे वळू व म्हैस वळू (रेडे) त्या भागातील आदिवासींना मो फत वाटले जातात. जे आदिवासी शेतकरी वळू सांभाळण्यास तयारी दर्शवितात त्यांना त्यासाठी द.म. रू. ६०/- दराने वळू खावटी दिली जाते. वळूंची किंमत रू. २०००/- पर्यंत अनुदान म्हणून समजण्यात येते. दरवर्षी जवळजवळ १०० ते १५० वळूंचे वाटप करण्याचे उद्दिष्ट आहे. ही योजना जिल्हा पशु संवर्धन अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येते.

४. दुग्धव्यवसाय विकास :- आदिवासी विभागातील दुग्धव्यवसायात वाढ व्हावी या दृष्टीने राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. अधिक दूध देणाऱ्या गाई - म्हशी आदिवासींना मिळाव्यात व ग्रामीण भागात रोजगारासाठी संधी व उत्पन्नात निश्चित वाढ करणारा एक सफल जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय विकासाला अत्यंत महत्त्व आहे. दुग्धव्यवसाय विकासाच्या कार्यक्रमात आदिवासींचा सहभाग वाढावा, या हेतूने शासनाने निरनिराळ्या योजनांसाठी विशेष अनुदानाचे प्रयोजन केले आहे.

१. दुग्ध उत्पादन, दुग्ध व्यवसाय विकास संस्था, संघ, महासंघ यांना व्यवसाय स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य.

२. सहकारी दूध संस्थांच्या सचिवांचे प्रशिक्षण कार्यक्रम .

३. दुर्बल घटकातील कुटूंबांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम:- आदिवासी जोडप्यांना ओक आठवड्याचा दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन संबंधीचे प्रशिक्षण देण्यात येते. असे प्रशिक्षण वर्ग दुग्ध विकास खाते किंवा पशुसंवर्धन खाते

यांच्या सहकारी मालकीच्या फार्मवर देण्यात येते. या प्रशिक्षणात प्रत्येक जोडप्यामागे रू. ४००/- प्रवास खर्च, राहणे, जेवणखाण इ.साठी येणारा खर्चही या योजनेमार्फत करण्यात येतो. अशा प्रशिक्षित जोडप्यांना जिल्हा ग्रामीण विकास योजनेखाली दुभती जनावरे खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते व त्याचा पाठपुरावा करण्यात येतो.

४. १ वर्षे वयाच्या उच्चैदास क्षमतेच्या पारडयांचा पुरवठा :- दुग्ध व्यवसाय विभागामार्फत गरजू गरीब होतकरू आदिवासी लाभार्थींना रू. १००/- इतक्या नाममात्र किंमतीत १ वर्षे वयाच्या पारडयांचा पुरवठा केला जातो. रू. १००/- भरल्या नंतर उरलेली रक्कम अनूदान म्हणून देण्यात येते. यामध्ये म्हैसाणा किंवा सुरती जातीची १ वर्षे वयाची पारडी दिली जाते.

५. भाकड व गाभण म्हशींसाठी अनुदान :- भाकड म्हशी खरेदीकरून त्यांना खेडयात आदिवासींकडे पाठवावयाचे त्याकरिता शासनातर्फे अनुदान आणि बँकेकडून कर्ज घ्यावयाचे अशी ही योजना आहे. भाकड काळात त्यांना आदीवासी पाळतात आणि त्या व्यायल्यानंतर दूध द्यायला लागल्यानंतर त्या दुधाच्या उत्पन्नातून कर्जाची वसूली होते.

६. भाकड गाभण म्हशींसाठी वाहतूक अनुदान :- प्रत्येक म्हशीच्या वाहतूकीसाठी होणाऱ्या खर्चाच्याअंतराचे प्रमाणात किंवा जास्तीत जास्त रू. ३००/- पैकी जी कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य म्हणून दिली जाते.

७. वैरण लागवड :- जनावरांकरिता उत्तम चारा मिळावा या दृष्टीने उत्तम जातीच्या चाऱ्यांचे बि - बियाणे किंवा संकरित नेपियर जातीच्या चाऱ्यांची रोपे किंवा मुळे पुरविण्याचे कामही राज्य शासनाव्दारे केले जाते.

५. रस्ते व पूल :- १९८१-२००१ पर्यंत रस्ते विकास आराखडयातील योजनांतर्गत रस्त्यांची सुधारणा नविन बांधकाम मोऱ्या, लहान व मोठे पूल, डोंगराळ भागात साकव व हरिजन वस्त्यांना जोडरस्ते पुरविणे ही कामे रस्ते विकास शिर्षाखाली घेतली जातात. लोकप्रतिनिधींच्या मागण्यांना अग्रक्रम दिला जातो व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेतली जातात.

अ. साकव बांधणे :- डोंगराळ प्रदेशामध्ये मुख्य गावाच्या लहान - लहान वाडया/वस्त्या दूर असतात. पावसाळ्यामध्ये गावाजवळील नाल्यांना, नदीला येणाऱ्या पुरामुळे अशा वस्त्या मुख्य गावापासून अलग पडतात. मुलांना शाळेत जाण्यासाठी , आजारी माणसाला दवाखान्यात नेण्यासाठी अगर खेडूतांना बाजारात जाण्यासाठी नदी नाल्यावर पूल नसल्याने फारच गैरसोय होते. त्यासाठी अशा नाल्यांवर उच्च पातळीचा पूलवजा साकव दिल्यास लोकांची गैरसोय दूर होईल अशा दृष्टीने शासनाकडून साकव बांधकामासाठी या योजनेतून निधी उपेलब्ध करून दिला जातो.

साकव मंजूर करण्याबाबत शासनाने खालील मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत:-

१. साकवाची लांबी जास्तीत जास्त १०० मिटर असावी.

२. अंदाजित किंमत ५ लाखापर्यंत असावी.

३. नियोजित साकवाच्या आजूबाजूस ३ कि.मी. पर्यंत पूल अस्तीत्वात नसावा. यासाठी लोक प्रतिनिधींच्या मागण्यांना अग्रक्रम दिला जातो.

ब. जिल्हा रस्ते विकास :- किमान गरजा कार्यक्रम सोडून -

१९८१ - २००१ रस्ते विकास आराखडयातील रस्त्यांच्या सुधारणा उदा. मजबूतीकरण व डांबरीकरण, मोऱ्या लहान व मोठ्या पुलांची कामे, रस्त्यांचे रुंदीकरण, रस्त्यांचे नवीन बांधकाम इ. कामे आवश्यक्तेनुसार निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनेमधून घेतली जातात. अर्थात लोक प्रतिनिधींनी केलेल्या कामांच्या मागण्योना अग्रक्रम दिला जातो.

क. किमान गरजा कार्यक्रमांतर्गत जिल्हा रस्ते :- रस्त्यांचे खडीकरण करणे व मोऱ्या बांधकामे करून रस्ता बारमाही वाहतुकीस योग्य करणे ही किमान गरजांची कामे या योजनेमधून घेतली जातात. यासाठी १९८१-२००१ रस्ते विकास आराखडयातील योजनांतर्गत रस्त्यांमधूनच ही कामे घेतली जातात. लोकप्रतिनिधींची मागणी व उपलब्ध निधीनुसार ही कामे घेतली जातात.

ड. विशेष घटक योजनेअंतर्गत हरिजन वस्त्यांना जोडणारे रस्ते :- गावाच्या हरीजन वस्त्या मुख्य गावापासून दूर असतात. अशा हरिजन वस्त्यांना मुख्य गावापर्यंत अगर लगतच्या मुख्य रस्त्यास जोडणारे रस्ते देण्यासाठी शासन या योजनेमधून निधी उपलब्ध करुन देत असते. हे जोड रस्ते खडीच्या । पृष्ठभागाचे करुन हरिजन वस्त्यांना रस्त्यांची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

६. विद्युत विकास :-

१. ग्रामीण विद्युतीकरण :- सदर योजनेखाली प्रामुख्याने गावाचे विद्युतीकरण करण्यात येते. ज्या वाडया/वस्त्यांना नवीन महसूल गावाचा दर्जा मिळाला आहे. अशा वाडया/वस्त्यांच्या विद्युतीकरणाची कामे सदर योजनेखाली करण्यात येतात.

२. सामान्य विकास :- विद्युतीकरण झालेली गावे/वाडया विस्तारीत कामे सदर योजनेखाली प्रामुख्याने करण्यात येतात. उदा :- घरगुती वीजपुरवठा, औद्योगिक कृषिपंप, रस्त्यावरील दिवे इ. कामे.

३. पध्दती सुधारणा :- सदर योजनेखाली प्रामुख्याने कार्यान्वीत असलेल्या विद्यूत वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची कामे केली जातात. उदा. जादा क्षमतेचे साहित्य बसविणे, जादा क्षमतेच्या विद्युत वाहिनी टाकणे तसेच उच्चदाब व कमी दाबाच्या वाहिनी उभारणे, सातत्याने वाढणाऱ्या विजेच्या मागणीमुळे वितरण व्यवस्थेत वरीलप्रमाणे

सुधारण्याची कामे करणे आवश्यक ठरते व त्यामुळे कमी दाबाच्या व वारंवार खंडीत वीजपुरवठ्याची तक्रार कमी होण्यास मदत होते.

४. हरिजन वस्ती विद्युतीकरण :- गावाचे विद्युतीकरण करताना गावालगतच्या हरिजन वस्त्यांचे विद्युतीकरण प्राधान्याने करता येते. जिल्ह्यातील सर्व गावठाणातील विद्युतीकरणाची कामे पूर्ण केलेली आहे. आता हरिजन वस्त्यांच्या विद्युतीकरणासंबंधी जागा मागण्याचे विस्तारीत कामे ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार सदर योजनेखाली करण्यात येते.

७. सामाजिक व सामुहिक सेवा :-

१. प्राथमिक शाळात पुस्तक पेढ्या उघडणे :- सदर योजनेअंतर्गत प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या इयत्ता १ली ते ७वी या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पुस्तके पुरविली जातात. सदरची पुस्तके बालभारती, पुणे यांचेकडून पुरविली जातात. इयत्ता १ली, २री व ६वी, ७वी साठी पुस्तके खरेदी करण्याकरिता तरतूद प्रस्तावित केली आहे. मुलांना शाळेत येण्यास प्रोत्साहन म्हणून गळतीचे प्रमाण कमी होण्याचे दृष्टीने योजना प्रस्तावित केली आहे.

२. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भागातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती पुरविणे:- आदिवासी भागातील प्राथमिक शाळांच्या इ. १ली ते ४ थी या वर्गातील विद्यार्थ्यांची गळती व हजेरीतील अनियमितपणा कमी करुन नियमित उपस्थिती वाढविणेसाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेषाचे संच व लेखनसाहित्य पुरविले जाते. गणवेशाचे प्रत्येक संचात मुलासाठी एक अर्धी चड्डी, सदरा व मुलींसाठी फ्रॉक यांचा समावेश असतो. ज्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील साक्षरतेचे प्रमाण १०% पेक्षा कमी आहे व शाळेतील पटसंख्या ७०% पेक्षा कमी आहे अशा शाळेतील ६ ते ११ वयोगटातील पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरविले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यास गणवेशासाठी रू. ६०/- व लेखन साहित्यासाठी रू. १०/- या प्रमाणे खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे.

३. आदिवासी विद्यार्थ्यांनींना विद्यावेतन :- आदिवासी विद्यार्थी विद्याथीनींना शाळेत न येण्याचे मुख्य कारण त्यांची गरीबी होय हे सर्वश्रृत आहे. जरी त्यांना मोफत पाट्या, पुस्तके, गणवेश इ. पुरविण्यात आले तरीपण ते शाळेत येत नाहीत. म्हणून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्याकरीता विद्यावेतन देण्याची योजना राबविण्यात येते.

४. माध्यमिक शाळांतून पुस्तकपेढया उघडणे :- या योजनेअंतर्गत निल्हयातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना एकूण विद्यार्थी पट संख्येत २५% इतक्या प्रमाणात अनुसूचित जाती/जमाती/विमुक्त भटक्या जमाती/जातीच्या विर्द्यार्थ्यांना क्रमिक पाठ्य पुस्तके पुरविणे.

५. आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती :- या योजनेअंतर्गत अनुदान तत्वावरील उच्च माध्यमिक विद्यालयातील इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ दिलेला आहे. या सवलतीमध्ये सत्रफी, प्रवेश फी, शिक्षण फी चा समावेश आहे.

६. इ. १२ वी पर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण :- इयत्ता १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण योजनेखाली विहित केलेल्या अटीस अधीन राहून शैक्षणिक सवलतीचा लाभ देण्यात येतो. यात शिक्षण सवलत व प्रवेश फी चा अंतर्भाव असतो.

७. दुर्बल घटकातील मुलींना शाळेत नियमित येण्यासाठी उपस्थिती भत्ता :- दारिद्रय रेषेखालील कमी उत्पन्नाच्या गटातील इयत्ता १ली ते ४थी पर्यंत शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण कमी आहे. पटनोंदणी वाढविण्याच्या उद्देशाने मुलींना प्रतिदिनी १ रूपया उपस्थिती भत्ता शासनाच्या नियमानुसार देण्यात येतो. एकूण २२० दिवस उपस्थिती राहिल्यास एका मुलीस २२० /- रूपये खर्च येतो.

८. जनशिक्षण निलयम केंद्राचे प्रबलीकरण :- नवसाक्षरांनी आत्मसात केलेली साक्षरतेची कौशल्ये कायम स्वरूपात टिकवून ती वृध्दींगत व्हावीत म्हणून जनशिक्षण निलायम केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. सदरील नवसाक्षरांना मनोरंजन व खेळ या बरोबरच कार्यात्मकता साधावी म्हणून जनशिक्षण निलायम केंद्रांना वर्षे १९९१-९२ मध्ये विविध प्रकारची मदत देण्यात आली. उदा. शिवण मशीन पुरविणे, तसेच ही केंद्रे चालू ठेवण्यासाठी प्रत्येक केंद्रावर एक प्रशिक्षक संघटिका किंवा संघटक नेमण्यात येत असून त्यावरील खर्चसुध्दा या योजनेमधून करण्यात येतो.

शिक्षक संघटिका/संघटकास दरमहा रू. १००/- इतके मानधन देण्यात येते.

## प्रकरण क्र. ४

### क्षेत्रीय पाहणी अहवाल - विवेचन

विवीध शासकिय योजनांचा लाभ दारिद्रय रेषेखालील ७५% पेक्षा जास्त आदिवासी लाभधारकांनी घेतला आहे. यातील सर्वच लाभधारकांचे उत्पन्न वाढले आहे असे नाही.

क्षेत्रीय निरिक्षणासाठी ठाणे जिल्ह्यातील डहाणू, पालघर, तलासरी, वाडा, जव्हार, मोखाडा, शहापूर अशा सात तालूक्यांतील लाभधारकांच्या घरी समक्ष भेटी देवून लाभधारकांकडून चर्चेअंती प्रश्नावली भरून घेण्यात आल्या व त्यावर आधारित मूल्यमापन अहवाल तयार केला आहे. पाहणीत गोळा केलेल्या कुटूंबांची आर्थिक माहिती उत्पन्न वाढण्याची तसेच उत्पन्न न वाढण्याची कारणे यांचे पृथ:करण निरनिराळया तक्त्यांच्या आधारे केले आहे ते पुढील प्रमाणे.

तक्ता क.४.१

लाभार्थींचे जमातीनिहाय वर्गीकरण

| अ.क. | तालुके | एकुण लाभार्थी | जमातीचे नांव | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वारली | मल्हार कोळी | महादेव कोळी | कात करी | कोकणा | दुबळा | धोडी | ग. ठाकूर | भोई |
| १ | जव्हार | ७७ | ५२ | १० | ० | ९ | ६ | ० | ० | ० | ० |
| | | | ६७% | १३% | ०% | १२% | ८% | ०% | ०% | ०% | ०% |
| २. | डहाणू | ४५ | ४० | २ | ० | ० | ० | २ | १ | ० | ० |
| | | | ८९% | ४.५% | ०% | ०% | ०% | ४.५% | २% | ०% | ०% |
| ३ | मोखाडा | ३२ | ४ | ० | १३ | ० | १५ | ० | ० | ० | ० |
| | | | १२% | ०% | ४१% | ०% | ४७% | ०% | ०% | ०% | ०% |
| ४. | तलासरी | २० | ८ | ० | ० | ० | ११ | ० | १ | ० | ० |
| | | | ४०% | ०% | ०% | ०% | ५५% | ०% | ५% | ०% | ०% |
| ५. | शहापूर | २९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २९ | ० |
| | | ०% | ०% | ०% | ०% | ०% | ०% | ०% | ०% | १००% | ०% |
| ६. | वाडा | ४ | ० | ० | १ | २ | ० | ० | ० | ० | १ |
| | | ०% | ०% | ०% | २५% | ५०% | ०% | ०% | ०% | ०% | २५.५०% |
| एकुण | | २०७ | १०४ | १२ | १४ | ११ | ३२ | २ | २ | २९ | १ |
| %वारी | | १००% | ५०.२४% | ५.७९% | ६.७६% | ५.३१% | १५.५०% | ०.९६% | .०.९६% | १४% | ०.४८% |

अेकात्मिक ग्रामीण विकास योजना, न्यूक्लीअस बजेट, कृषी व संलग्न सेवा, आदिवासी विकास महामंडळाच्या योजना, या सर्व योजनांचा फायदा ठाणे जिल्हयातील विविध जमातींनी किती प्रमाणात घेतला याचा अभ्यास केला असता पुढील निष्कर्ष हाती आले.

सर्वात जास्त योजनांचा फायदा घेण्यामध्ये वारली जमातीचा सहभाग सर्वाधिक होता. एकूण लाभधारकांपैकी ५०.२४% वारली जमातीने या योजनांचा फायदा घेतला. त्या खालोखाल १५.५० % कोकणा या जमातीस योजनांचा फायदा झाला. व त्या खालोखाल ठाकूर या जमातीने घेतला. त्यानंतर महादेव कोळी, मल्हार कोळी, कातकरी या जमातींतील लोकांनी या योजनांपासून फायदा घेतला.

येथे अेक गोष्ट जाणवली की, अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ठ नसलेली (भोई )जातीच्या काही लोकांनी आपण अनुसूचित जमातीचे आहोत असे सांगून लाभ मिळविल्याची उदाहरणे आढळली. वाडा तालुक्यामध्ये असे चार लाभार्थी आढळले की ज्यांनी आपण आदिवासी आहोत असे सांगून आपली जमात ( भोई ) असल्याचे सांगीतले. जव्हार, डहाणू, तलासरी या तालुक्यामध्ये मात्र वारली, कोकणा, कातकरी, म.ठाकूर जमातीचे प्राबल्य आढळते.

## तक्ता क्र ४:२

### कोरडवाहू जमीन, बागायती जमीन व पडीक जमीनीचे धारण क्षेत्रानुसार वर्गीकरण

| क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | कोरडवाहू जमीन असणारे लाभार्थी | | | | | | बागायती जमीन असलेले लाभार्थी | | | | | | पडीक जमीन असलेले लाभार्थी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ० | १ एकर पर्यंत | १ ते ४ एकर | ५ ते १० एकर | १० ते १५ एकर | १५ च्या वर | ० | १ एकर पर्यंत | १ ते ४ एकर | ५ ते १० एकर | १० ते १५ एकर | १५ च्या वर | ० | १ एकर पर्यंत | १ ते ४ एकर | ५ ते १० एकर | १० ते १५ एकर | १५ च्या वर |
| १ | जव्हार | ७७ | १४ | १ | ५२ | ९ | ० | १ | ७० | १ | ४ | २ | ० | ० | ६१ | २ | १४ | ० | ० | ० |
| २ | डहाणू | ४५ | ८ | १ | २७ | ९ | ० | ० | ४१ | १ | ३ | ० | ० | ० | ४५ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | मोखाडा | ३२ | १६ | ० | ८ | ६ | ० | २ | ३२ | ० | ० | ० | ० | ० | ३१ | ० | १ | ० | ० | ० |
| ४ | तलासरी | २० | १ | १ | १७ | १ | ० | ० | १९ | ० | १ | ० | ० | ० | १९ | ० | १ | ० | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | ५ | ४ | २० | ० | ० | ० | २९ | ० | ० | ० | ० | ० | २९ | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वाडा | २६ | ४ | ० | २१ | १ | ० | ० | १८ | ० | ८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | २२९ | ४८ | ७ | १४५ | २६ | ० | ३ | २०९ | २ | १६ | २ | ० | ० | २११ | २ | १६ | ० | ० | ० |
| | टक्केवारी | १००% | २१% | ३% | ६३% | १२% | ० | १% | ९१% | १% | ७% | १% | ० | ० | ९३% | ० | ६% | ० | ० | ० |

उपरोक्त तक्त्यामध्ये आदिवासींजवळ असलेल्या जमीनीचे पडीक, कोरडवाहू व बागायती यानुसार वर्गीकरण केले असता पुढील निष्कर्ष हाती आले :-

१. निवडलेल्या लाभधारकांपैकी १५७ लाभधारकांकडे (६९ टक्के) १ अेकरपासून १० अेकरपर्यंत कोरडवाहू जमिन असल्याचे निदर्शनास आले. या जमिनीमध्ये शेती करण्यासाठी सर्वस्वी पावसावरच अवलंबून रहावे लागते. यातही १ अेकर पासून ४ अेकरपर्यंत जमिनधारणा असणाऱ्या लाभधारकांचा भरणा सर्वाधिक (६३ टक्के) असल्याचे आढळले.

२. ठाणे जिल्हयातील या आदिवासी तालुक्यांमध्ये 'कृषी व संलग्नसेवा ' अंतर्गत विहिर वाटप योजनेमुळे तर ऑईल इंजिन वाटपामुळे काही शेतकऱ्यांच्या जमिनी बागायत झाल्याचे आढळून आले. या बागायत जमिन धारकांचे प्रमाण अत्यल्प (२० = ९%) होते. यातही १ ते ४ एकर जमिन धारणा असणारे अल्प-भू धारक आढळून आले. बागायती जमिनीचा उपयोग धान्योत्पादना बरोबरच थोडा फार भाजीपाला व फळबाग लावण्याकडे असल्याचे निदर्शनास आले.

३. ठाणे जिल्हयातील निवडलेल्या लाभधारकांकडे पडीक जमिनीचे प्रमाण किती आहे याची माहिती घेतली असता पडीक जमीनीचे प्रमाण अल्प आढळले. एकूण लाभधारकांपैकी १८ लाभधारकांकडे १ ते ४ एकर या धारण क्षेत्रातील ८.५३% जमिन पडीक आढळली. या जमिनीवर कोणतीही पिके घेतली जात नसल्याचे आढळून आले. जमिन पडिक राहण्याची कारणे काय आहेत हे जाणून घेतले असता - खडकाळ मुरुम व चुनायुक्त जमिन तसेच शेतात झाडे - झुडपे यांचे प्रमाण जास्त असल्याने ही जमिन पडिक असल्याचे निदर्शनास आले.

तक्ता क्र. ४:३

लाभार्थींचे धारण क्षेत्रानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | शेती धारण क्षेत्रानुसार एकूण लाभार्थी. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भूमिहिन | १ एकर पर्यंत | १ ते ४ एकर | ५ ते १० एकर | १० ते १५ एकर | १५ च्या वर |
| १ | जव्हार | ७७ | १२ | २ | ४८ | १३ | १ | १ |
| २ | डहाणू | ४५ | ६ | १ | २८ | १० | ० | ० |
| ३ | मोखाडा | ३२ | १६ | ० | ८ | ६ | ० | २ |
| ४ | तलासरी | २० | १ | १ | १५ | ३ | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | ५ | ४ | २० | ० | ० | ० |
| ६ | वाडा | २६ | १ | ० | २१ | ४ | ० | ० |
| | एकूण | २२९ | ४१ | ८ | १४० | ३६ | १ | ३ |
| | टक्केवारी | १००% | १८% | ४% | ६१% | १६% | ० | १% |

लाभधारकांचे जमिनीचे धारण क्षेत्रानुसार वर्गीकरण केले असता :-

१. पाहणीमध्ये ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यामध्ये भूमिहीन लाभधारकांचे प्रमाण सर्वाधिक आढळले.

२. एकूण २२९ लाभधारकांपैकी ४१ लाभधारक (१८%) भूमिहीन असल्याचे निदर्शनास आले. ही लाभधारक कुटूंबे मोलमजूरी करुन स्वत:चा चरितार्थ चालवतात.

३. १ एकर ते ४ एकर पर्यंतचे लाभधारक अल्पभूधारक गटामध्ये येतात. असे ६५% लाभधारक आहेत. या गटात लाभधारकांचा भरणा सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. १० एकरच्या पुढे जमिन धारणा असणारे केवळ ४ लाभधारक (१%) आढळून आले.

याचाच अर्थ विविध योजनांचा लाभ घेणाऱ्यांमध्ये अल्प भूधारक गटाचा भरणा अधिक होता.

तक्ता क्र ४:४

लाभार्थींना लाभ मिळण्यापूर्वीचा व्यवसाय व सद्यस्थितील मुख्य व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ. क्र | तालुके | एकूण लाभार्थी | लाभ मिळण्यापूर्वीचा व्यवसाय | | | | | | लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेती | शेत मजुरी | नोकरी | घरगुती उद्योग | कुटिर उद्योग | अन्य | शेती | शेत मजुरी | नोकरी | घरगुती उद्योग | कुटिर उद्योग | अन्य |
| १ | जव्हार | ७७ | ५७ | १२ | ० | ० | ० | २ | ५९ | १४ | ० | ० | ० | ० |
| | | | ७४% | १५% | ० | ० | ० | ३% | ७७% | १८% | ० | ० | ० | ० |
| २ | डहाणू | ४५ | ३७ | ५ | १ | ० | ० | ० | ३९ | ५ | ० | ० | ० | १ |
| | | | ८२% | ११% | २% | ० | ० | ० | ८७% | ११% | ० | ० | ० | २% |
| ३ | मोखाडा | ३२ | १६ | १६ | ० | ० | ० | ० | १६ | १५ | १ | ० | ० | ० |
| | | | ५०% | ५०% | ० | ० | ० | ० | ५०% | ४७% | ३% | ० | ० | ० |
| ४ | तलासरी | २० | १९ | ० | ० | ० | ० | ० | १९ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | ९५% | ० | ० | ० | ० | ० | ९५% | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | २३ | ३ | ० | ० | ० | ० | २३ | ६ | ० | ० | ० | ० |
| | | | ७९% | १०% | ० | ० | ० | ० | ७९% | २१% | ० | ० | ० | ० |
| ६ | वाडा | २६ | २५ | १ | ० | ० | ० | ० | २२ | ४ | ० | ० | ० | ० |
| | | | ९६% | ३% | ० | ० | ० | ० | ८५% | १५% | ० | ० | ० | ० |
| एकूण | | २२९ | १७७ | ३७ | १ | ० | ० | २ | १७८ | ४४ | १ | ० | ० | १ |
| टक्केवारी | | १००% | ७७% | १६% | ० | ० | ० | ०.५% | ७८% | १९% | ० | ० | ० | ० |

उपरोक्त तक्ता क्रमांक ४:४ मध्ये ठाणे जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांचा प्रमुख व्यवसाय निर्देशित केला आहे. हा तक्ता ठाणे जिल्हयातील आदिवासी जमींतींचा मुख्य व्यवसाय प्रातिनिधिक स्वरुपामध्ये निर्देशित करतो आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. या तक्त्याचे अध्ययन केले असता असे लक्षात येते की लाभ मिळण्यापूर्वी ७७

टक्के लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. तर १६% लाभार्थी शेतमजूरी करीत होते. लाभार्थ्यांना त्यांचा सद्य स्थितीमधे मुख्य व्यवसाय कोणता? हा प्रश्न विचारला असता ७८% लाभार्थ्यांनी त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असल्याचे सांगितले . तर १९% लाभार्थ्यांनी ते शेतमजूरीवर उपजिविका करीत असल्यामुळे शेतमजूरी हाच त्यांचा मुख्य व्यवसाय असल्याचे सांगितले. मुलाखत घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी कोणीही नोकरी, हस्तव्यवसाय, कुटिरोद्योग मुख्य व्यवसाय म्हणून करीत नव्हते, काहींच्या कुटूंबातील व्यक्ती, इतर नातेवाईक किंवा स्वत: लाभार्थी नोकरी, हस्तव्यवसाय कुटिरोद्योग दुय्यम व्यवसाय म्हणून करीत असल्याबाबतची माहिती या लाभार्थ्यांनी दिली. मात्र हे प्रमाणही अतिशय कमी असल्याचे जाणवले. त्या संदर्भातील सांख्यिकी माहिती व विश्लेषण पुढे येत आहेच. पणा एकुणच शेती व शेतमजूरी हेच या लाभार्थ्यांचे मुख्य व्यवसाय असल्याचे वरील माहितीवरून ठळकपणे निर्देशित होते. त्या जोडीला अन्य घटकांतर्गत हे लाभार्थी थोडेफार उत्पन्न मिळवित असल्याचे दिसते. या अन्य घटकांमध्ये शिकार, मारोमारी, गौण व नौपनकांची विक्री, मोहाची दारू अथवा ताडी विक्री याचा समावेश होतो.

तक्ता क्र. ४:५

लाभधारकांचे दुय्यम व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | लाभार्थ्यांचा दुय्यम व्यवसाय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेती | शेतमजुरी | नोकरी | घरगुती उद्योग | कुटिर-उद्योग | अन्य |
| १ | जव्हार | ७७ | १ | ४३ | २ | १ | ३ | ५ |
| | | | १% | ५६% | ३% | १% | ४% | ६% |
| २ | डहाणू | ४५ | १ | १७ | ० | ५ | १ | ० |
| | | | २% | ३८% | ० | ११% | २% | ० |
| ३ | मोखाडा | ३२ | ० | २७ | ० | १ | १ | ० |
| | | | ० | ९३% | ० | ३.५% | ३.५% | ० |
| ४ | तलासरी | २० | ० | ७ | ० | ३ | ० | ० |
| | | | ० | ३५% | ० | १५% | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | ० | २९ | ० | ० | ० | ० |
| | | | ० | १००% | ० | ० | ० | ० |
| ६ | वाडा | २६ | ० | १५ | ० | १ | ० | ३ |
| | | | ० | ५८% | ० | ४% | ० | १२% |
| एकूण | | १६६ | २ | १३८ | २ | ११ | ५ | ८ |
| टक्केवारी | | ७१.५% | ०.५% | ६०% | ०.५% | ५% | २% | ३.५% |

मागील तक्त्यामध्ये आपल्याला लाभार्थ्यांच्या प्रमुख व्यवसायाबाबत माहिती मिळाली. उपरोक्त तक्त्यामध्ये ठाणे जिल्हयातील उपयोजना क्षेत्रातील निवडलेल्या लाभार्थ्यांच्या दुय्यम व्यवसायाबाबत माहिती दिली आहे. ६०% लाभार्थी शेतमजूरी हा दुय्यम व्यवसाय करित आहेत. यामध्ये शेती व्यतिरिक्त कुटूंबाच्या जरितार्थाला आधार देण्याकरिता गावातील इतर शेतकऱ्यांकडे शेतमजूर म्हणून जाणे व मोबदल्यात धान्य, अेकवेळचे जेवण किंवा रोखरक्कम स्विकारणे हा

बहुतेक आदिवासींचा जीवनक्रम बनला आहे, दुय्यम व्यवसायामध्ये घरगुती व्यवसाय व कुटिरोद्योग करणारे लाभार्थी अल्प म्हणजे अनुक्रमे ५% व २% आहेत.

नोकरी हा दुय्यम व्यवसाय म्हणून नमूद करणारे अतिशय थोडे ०.५% आहेत. पण इथे आदिवासींच्या मानसिकतेवर त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांवर प्रकाश झोत टाकणारी एक बाब नमूद केली पाहिजे की बहुसंख्य लाभार्थ्यांनी दुय्यम व्यवसाय म्हणून शेतीचा उल्लेख केला नाही. ०.५% एवढयाच लोकांनी शेतीचा दुय्यम व्यवसाय म्हणून उल्लेख केला. आदिवासी शेतकरी अल्पभूधारक असला, त्याला शेती पासून अगदी कमी उत्पन्न मिळत असले तरी तो मुख्य व्यवसाय म्हणून शेतीचा उल्लेख करतो. स्वत:ची जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला आदिवासी समाजात मोठा मान, विशेष दर्जा असतो. डहाणू तालुक्यातील काही लाभार्थ्यांना किराणा दुकानापासून मिळणारे उत्पन्न अथवा शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न जास्त आढळले तरीही त्यांनी मुख्य व्यवसाय शेती असल्याचे सांगितले. डहाणू येथील गंजाड भागातील काही वारली चित्रकारांची गुजराण त्यांच्या कलेवर चालते पण मिळणारा पैसा ते जमीन विकत घेण्यात खर्च करतात. शेती करण्यासाठी दुय्यम व्यवसायातून मिळणारे जास्तीचे उत्पन्न खर्च करतात. शेतीपासून किती लाभ होतो हे त्यांच्या लेखी महत्वाचे नाही. शेतजमीन असणे, ती कसणे यातून त्यांना फार मोठा मानसिक आनंद व सुरक्षितता मिळत असल्याचे क्षेत्रिय पहाणीत अनौपचारिक चर्चामधून लक्षात आले.

तक्ता क्र. ४.६

शेतीसाठी पाण्याच्या सोईनुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | शेतीसाठी पाण्याची सोय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विहिर | तलाव | नदी | धरण | कॅनॉल |
| १ | जव्हार | ७७ | ५ | ० | ३ | ० | ३ |
| | | | ७% | ० | ४% | ० | ४% |
| २ | डहाणू | ४५ | ४ | २ | ० | २ | २ |
| | | | ९% | ४% | ० | ४% | ४% |
| ३ | मोखाडा | ३२ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | तलासरी | २० | २ | ० | ० | ० | ० |
| | | | १०% | ० | ० | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वाडा | २६ | ७ | ० | ० | ० | १ |
| | | | २७% | ० | ० | ० | ४% |
| एकूण | | २२९ | १८ | २ | ३ | २ | ६ |
| टक्केवारी | | १००% | ८% | ०.५% | १% | ०.५% | ३% |

आधिच्या तक्तयांमध्ये विशद केल्या नुसार आदिवासी शेतकऱ्यांची जमीन बहुतांशी कोरडवाहू असते. या मुल्यमापन अहवालाकरिता मुलाखत घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी ६९% लाभधारकांची जमिन कोरडवाहू आढळली. या माहितीला पुष्टी देणारी सांखिकी आकडेवारी उपरोक्त तक्त्यात दर्शविली आहे. मुलाखत घेतलेल्या २२९ लाभार्थ्यांपैकी फक्त ३१ लाभार्थ्यांच्या शेतीसाठी १३% लाभधारकांच्या शेतात पाण्याची सोय असल्याचे निदर्शनास आले.

या आकडेवारीनुसार फक्त ८% लभार्थ्यांकडे विहिर आढळली. ३% लाभार्थ्यांच्या जमिनीला कॅनॉलचे पाणी मिळते, १% लाभार्थ्यांच्या जमीनीला नदीचे पाणी मिळते तर १% लाभार्थ्यांना तलाव व धरणाचे पाणी उपलब्ध झाले असल्याचे आढळले. आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी उपलब्ध असलेली पाण्याची सुविधा पाहिली असता विहिरीच्या पाण्याचा लाभ घेणाऱ्यांची संख्या त्यातल्या त्यात जास्त ८% आढळली. या मूल्यमापन अहवालाकरिता क्षेत्रिय पहाणी व्दारा गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीवरुन एकूण ६९% लाभार्थ्यांकडे कोरडवाहू जमिन आहे. अशी कोरडवाहू जमिन असणाऱ्यांपैकी किती जणांच्या शेतीचे आकारमान विहिर देण्यास योग्य आहे. कोणत्या जमिनीला पाणी लागण्याची शक्यता आहे. याची पडताळणी भूजल सर्वेक्षण संस्थेव्दारा केल्यास कोरडवाहू जमिनीपैकी बरीच जमिन ओलिताखाली येण्यास वाव मिळेल आणि त्यामुळे शेतात निरनिराळया प्रकारचे उत्पन्न घेता येवून आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. पण प्रत्यक्षात विहीर मागणाऱ्या आदिवासी शेतकऱ्याकडे अतिशय किचकट कागदपत्रांची जंत्री मागितली जाते. व जमिनीच्या आकाराबाबतच्या अटीमुळे आदिवासी शेतकरी जीवनधारा, दशलक्ष विहीर सारख्या योजनांचाही लाभ घेवू शकत नाहीत असे आढळले.

तक्ता क्र. ४:७

लाभार्थ्यांचे शेतीपासून व शेतमजूरीपासून मिळणारे उत्पन्न (रूपयात)

| क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | शेतीपासून मिळणारे उत्पन्न | | | | | शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न | | | | | घरगुती उद्योगापासून मिळणारे उत्पन्न | | | | | कुटिरोद्योगापासून मिळणारे उत्पन्न | | | | | नोकरी पासून मिळणारे उत्पन्न | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ० | १ ते २००० | २००१ ते ४००० | ४००१ ते ६४०० | ६४०० च्या वर | ० | १ ते २००० | २००१ ते ४००० | ४००१ ते ६४०० | ६४०० च्या वर | ० | १ ते २००० | २००१ ते ४००० | ४००१ ते ६४०० | ६४०० च्या वर | ० | १ ते २००० | २००१ ते ४००० | ४००१ ते ६४०० | ६४०० च्या वर | ० | २००१ ते ४००० | ४००१ ते ६४०० | ६४०० च्या वर | ६४०० च्या वर |
| १ | जव्हार | ७७ | ११ | २३ | २४ | ७ | १२ | २३ | २ | ११ | १६ | २५ | ६४ | १० | ३ | ० | ० | ६८ | ६ | १ | ० | २ | ७० | १ | १ | १ | ४ |
| २ | डहाणू | ४५ | ४ | १२ | ११ | १२ | ६ | १६ | ० | ७ | १० | १२ | ४३ | १ | ० | १ | १८ | १३ | ६ | १ | ७ | १२ | ४१ | ३ | ० | १ | ० |
| ३ | मोखाडा | ३२ | १६ | ८ | ४ | ४ | ० | ५ | ७ | ५ | ७ | ८ | २८ | ३ | १ | ० | ० | २९ | २ | ० | ० | १ | २९ | १ | ० | ० | २ |
| ४ | तलासरी | २० | १ | ७ | ६ | ५ | १ | ५ | २ | ३ | २ | ८ | १७ | २ | ० | ० | १ | १२ | २ | ० | १ | ५ | १९ | ० | ० | ० | १ |
| ५ | शहापूर | २९ | ३ | २४ | २ | ० | ० | २ | ४ | ३ | ५ | १५ | २८ | १ | ० | ० | ० | २७ | ० | ० | ० | २ | २८ | ० | ० | ० | १ |
| ६ | वाडा | २६ | १ | १४ | ४ | ७ | ० | २ | ४ | १७ | २ | १ | १६ | ८ | १ | १ | ० | १८ | ४ | १ | ० | ३ | २६ | ० | ० | ० | ० |
| | एकूण | २२९ | ३६ | ८८ | ५१ | ३५ | १९ | ५३ | १९ | ४६ | ४२ | ६९ | १९६ | २५ | ५ | २ | १ | १७२ | २७ | ८ | २ | २० | २१३ | ५ | १ | २ | ८ |
| | टक्केवारी | १००% | १६% | ३९% | २२% | १५% | ८% | २३% | ८% | २०% | १८% | ३१% | ८६% | १२% | २% | - | - | ७५% | १२% | ४% | - | ९% | ९४% | २% | - | - | ४% |

लाभधारकांना शेती, शेतमजूरी, घरगूती उद्योग कुटिरोद्योग व नोकरी या सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे विष्लेषण केले असता खालील निष्कर्ष हाती आले.

१. लाभधारकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने एकूण लाभधारकांपैकी ८४% लाभधारक शेतीवर उपजिविका करित असल्याचे दिसते. या ८४ % लाभधारकांपैकी ७६% लाभधारक फक्त शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे दारिद्रय रेषेखालील गटात येतात. यात ३९% लाभधारकांना रू. २०००/- पर्यंत उत्पन्न मिळते.

८% लाभधारक हे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे दारिद्रय रेषेच्या वर येतात.

२. शेती व्यतिरिक्त भूमिहिन अथवा १ एकर पर्यंत जमिन धारणा असणारे जे आदिवासी लाभार्थी आहेत ते 'शेतमजूरी ' हाच मुख्य व्यवसाय करतात. या व्यतिरिक्त अल्पभूधारक ही कुटूंबाचा चरितार्थ भागविण्यासाठी स्वत:ची शेती सांभाळून मोलमजूरी/शेतमजूरी करतात. अशा लाभधारकांना मिळणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषण केले असता शेतमजूरी करणाऱ्या गटातील सर्वाधिक (३१%) लाभधारक हे दारिद्रय रेषेच्या वर आहेत. व उर्वरीत ६९% लाभधारक दारिद्रयरेषेच्या खोली आहेत.

३. स्वत:ची शेती सांभाळून घरातल्या घरात उत्पन्न मिळविणाऱ्या कुटूंबांची पाहणी केली असता ३३ कुटूंबे (१४ %) घरगूती व्यवसायात गुंतलेली असल्याचे निदर्शनास आले. यात १२% लाभधारकांना रू. २०००/- पर्यंत व २% लाभधारकांना रू. २०००/- ते ४०००/- पर्यंत उत्पन्न मिळते.

४. शेती व्यवसाया बरोबरच कुटिरोद्योग करणारेही एकूण २५% लाभधारक आढळले.

५. नोकरी करून उत्पन्न मिळविणाऱ्या लाभधारकांचे प्रमाण मात्र नगण्य असल्याचे आढळले. एकूण लाभधारकांपैकी ७% लाभधारकांना नोकरी पासून उत्पन्न मिळते.

तक्ता क्र. ४:८

लाभधारकांचे एकूण वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण (रूपयात)

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | सर्व घटकापासून मिळणारे एकूण उत्पन्न(रूपयात) | | | | | दारिद्रय रेषेच्या वरील उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रू. ० | रु.१००० ते २००० | रु.२००१ ते ४००० | रु.४००१ ते ६४०० | रु.६४०० च्या पुढे | |
| १ | जव्हार | ७७ | - | ५ | ७ | १० | ५५ | ७१% |
| २ | डहाणू | ४५ | १ | ० | २ | ४ | ३८ | ८४% |
| ३ | मोखाडा | ३२ | - | ५ | ३ | ८ | १६ | ५०% |
| ४ | तलासरी | २० | - | ० | ३ | ० | १७ | ८५% |
| ५ | शहापूर | २९ | - | २ | ५ | ५ | १७ | ५९% |
| ६ | वाडा | २६ | - | ० | २ | ११ | १३ | ५०% |
| | एकूण | २२९ | १ | १२ | २२ | ३८ | १५६ | -- |
| | टक्केवारी | १००% | - | ५% | १०% | १७% | ६८% | - |

उपरोक्त तक्त्यावरून ३२% लाभधारक दारिद्रय रेषेच्या खाली असून उर्वरीत ६८% लाभधारक दारिद्रय रेषेच्या वर असल्याचे दिसते.

२. वस्तूत: पाहणीतील ३२% लाभधारक कुटूंबे कोणत्याही प्रकारच्या लाभापासून उत्पन्न न घेता केवळ मोलमजूरी/शेतमजूरी करूनच दारिद्रयरेषेच्या उत्पन्न मर्यादेच्या वर उत्पन्न घेतात. याचाच अर्थ सद्य स्थितीला मोलमजूरी/शेतमजूरी करणारे कुटूंबही दारिद्रय रेषेच्या वर येते असा निघतो .

३. रू. ६४००/- ही दारिद्रय रेषेची मर्यादा निश्चीत करताना त्यावेळी असलेले जिवनावश्यक वस्तूंचे भाव व पैशांचे मूल्य यावर (किंमतनिर्देशांकावर) निश्चीत केली गेली आहे. त्यानंतर पैशाचे अवमूल्यन व जिवनावश्यक वस्तूंचे चढलेले भाव यांची तुलना करता आजच्या परिस्थीतीतही रू. ६४००/- ही दारिद्रय रेषेची मर्यादा तुटपुंजी वाटते आणि म्हणूनच दारिद्रय रेषेवरील लाभधारकांचे वरील तक्त्यातील प्रमाण अवाजवी असल्याचे दिसते.

४. कुटूंबातील मोलमजूरी करुन उत्पन्न घेणारे पतीस रू. ३०/- मजूरी व पत्नीस रू. २५/- येवढी मजूरी मिळते असे गृहित धरल्यास कुटूंबाचे एका दिवसाचे उत्पन्न ५५/- रू. येवढे होते. पावसाळयातील ४ महिने हे कुटूंब मजूरी करीत नाहित. व उर्वरीत ८ महिन्यातील अेका महिन्यात सरासरी २० दिवस काम मिळते असे गृहित धरलयास (२० दिवस x ८ महिने = १६० दिवस = १६० दिवस x ५५/- रू. मजूरी = ८८००/-) या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८८००/- च्या

आसपास येते आणि म्हणून तक्ता क्र ४.७ मध्ये सर्वात जास्त लाभधारक (३१%) शेतमजूरी करून दारिद्रय रेषेच्या वर असल्याचे निष्पन्न होते.

वार्षिक उत्पन्नावरून वर उदाहरणादाखल दिलेल्या कुटूंबांप्रमाणे अनेक कुटूंबे दारिद्रय रेषेच्या वर आहेत असा निष्कर्ष निघत असेल तर शासनाने निश्चित केलेली दारिद्रय रेषेच्या उत्पन्नाची मर्यादा चुकीची आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

तक्ता क्र. ४:९

लाभार्थींचे योजनानिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | योजना | एकूण | तालुके | | | | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जव्हार | डहाणू | मोखाडा | तलासरी | शहापूर | वाडा | |
| १ | बैलगाडी | ११ | ८ | २ | ० | १ | ० | ० | ४.८०% |
| २ | बैलजोडी | ३९ | १६ | २ | ९ | ७ | ५ | ० | १७.००% |
| ३ | बैलगाडी, बैलजोडी | ६१ | २९ | १६ | ० | ५ | १० | १ | २६.६१% |
| ४ | विटभट्टी | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | - |
| ५ | भाजीपाला | ३ | १ | ० | ० | ० | ० | २ | १.३१% |
| ६ | दुकान | १६ | ३ | ६ | २ | १ | १ | ३ | ७% |
| ७ | इंजिन | ५ | २ | ० | ० | ० | ० | ३ | २.१८% |
| ८ | मत्स्यपालन | ११ | ६ | ० | ० | ० | २ | ३ | ४.८०% |
| ९ | शिलाई मशीन | ९ | ४ | १ | २ | २ | ० | ० | ३.९३% |
| १० | सुतार कामाची हत्यारे | ४ | १ | १ | ० | ० | ० | २ | १.७४% |
| ११ | स्पीकर व मंडप | ६ | ३ | २ | १ | ० | ० | ० | २.६२% |
| १२ | बुरुडकाम | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | - |
| १३ | शेळीपालन | ३४ | १ | २ | १९ | २ | ४ | ६ | १४.८४% |
| १४ | विहिर | १४ | ६ | ४ | ० | ३ | ० | १ | ६.११% |
| १५ | गोबरगॅस | ६ | १ | १ | ० | ४ | ० | ० | २.६२% |
| १६ | बेजोपाटी | ४ | ० | ४ | ० | ० | ० | ० | १.७४% |
| १७ | चमचा पॉलीश | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | - |
| १८ | न्हावी काम-केस कापण्याचे साहित्य | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | - |
| १९ | म्हैस | २ | ० | ० | ० | २ | ० | ० | - |
| २० | इलेक्ट्रिक मोटर पंप | ४ | २ | ० | ० | ० | ० | २ | १.७४% |
| २१ | गवंडी काम | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | - |
| २२ | बि - बियाणे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | - |
| २३ | बायोगॅस | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | - |
| २४ | फळबाग योजना | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | - |
| २५ | खते | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | - |
| एकूण / टक्केवारी | | २४१ | ८९ | ४४ | ३३ | २७ | २३ | २५ | ९४.२६% |

निर्देशित तक्ता क्र ४:९ वरून ठाणे जिल्हयातिल नमूना निवडीतील एकूण २२९ लाभार्थींनी कोणकोणत्या योजनांचा प्राधान्याने लाभ घेतला हे स्पष्ट होते. वरील सांख्यिकी माहितीवरून असे स्पष्ट होते की, बैलगाडी, बैलजोडी योजनेचा लाभ सर्वाधिक म्हणजे ६१ लाभार्थ्यांनी घेतला आहे. त्याखोलोखाल ३९ लाभार्थ्यांनी फक्त बैलजोडी योजनेचा

लाभ घेतला. ३४ लाभार्थ्यांना एकात्मिक ग्रामिण विकास योजनेअंतर्गत दुकाने मिळाली. विहीर मिळालेल्या लाभार्थ्यांची संख्या १४ असल्याचे आढळले. तर १० जणांना मत्स्यपालनाकरिता जाळी मिळाली आहेत.

तक्त्याचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, डहाणू तालुक्यामध्ये स्पीकर व मंडप, बेंजो पार्टी, चमचा पॉलिश, न्हावी काम, केस कापण्याचे साहित्य, फळबाग योजना यासारख्या नाविन्यपूर्ण योजना देण्यात आल्या आहेत. अेकाच पाड्यावर दोघांना बेंजोपार्टी सारखी योजना दिल्यास त्यातून कुणालाच जास्त आर्थिक फायदा मिळणार नाही. याचा विचार केल्याचे पाहणीत दिसून येत नाही. तसेच चमचा पॉलिश सारखी योजना या भागात कितपत उपयुक्त ठरू शकते याचाही विचार केला असल्याचे आढळले नाही. न्हावीकाम, केस कापण्याचे साहित्य दिलेल्या लाभार्थ्याने मात्र छोटेसे दुकान थाटले असून त्याचा व्यवसाय चांगला चालला असल्याचे आढळले. शेळी पालनाची योजना एकूण ३४ लाभार्थ्यांना देण्यात आली. पण योग्य मार्गदर्शन व मिळालेल्या योजनतून उत्पन्न वाढविण्याची जिद्द या गोष्टीच्या अभावामुळे ठाणे जिल्हयात शेळीपालन व्यवसायातून आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न फसल्याचे दिसले. लाभार्थीही या योजनेत कमी पैसा मिळत असल्यामुळे नाराज असल्याचे दिसले. वर्षाकाठी एखादा बोकड विकला तर ३५० ते ४०० रु. मिळतात. अन्यथा या योजनेतून पैसा मिळत नाही अशी तक्रार या योजनेचा लाभ घेणाऱ्या बहुतेक लाभार्थ्यांनी केली.

बैलगाडी, बैलजोडी योजनेचा लाभ मिळालेल्या कुटूंबांना या योजनेचा वैयक्तिक कामाकरीता उपयोग झाला असला तरी गवत कापणीचा हंगाम सोडलयास बैलगाडया भाडयाने दिल्या जात नाहीत. असेही लाभार्थींनी सांगीतले.

थोडक्यात लाभधारकांना योजना देताना त्याची उपयुक्तता आर्थिक उत्पन्न वाढविण्याची योजनेची क्षमता लक्षात घेवून योजनेचे वाटप व्हावे. तसेच योजनांपासून आर्थिक उतपन्न वाढविण्याकरिता नेमके काय केले पाहिजे याची माहिती लाभार्थ्यांना देण्याकरिता मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे तितकेच आवश्यक असल्याचे जाणवले.

तक्ता क्र. ४:१०

दिलेला लाभ व उत्पन्नात झालेला बदल यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | लाभ मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या उत्पन्नाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तु आहे | वस्तु सुस्थितीत नाही. | उत्पन्नात बदल नाही. | उत्पन्नात वाढ |
| १ | जव्हार | ७७ | २५ | २८ | ७२ | ५ |
| २ | डहाणू | ४५ | २ | २ | ३४ | ११ |
| ३ | मोखाडा | ३२ | ९ | ८ | ३० | २ |
| ४ | तलासरी | २० | १ | २ | १७ | ३ |
| ५ | शहापूर | २९ | २२ | २२ | २८ | १ |
| ६ | वाडा | २६ | ५ | ९ | १९ | ७ |
| एकूण | | | ६४ | ७१ | २०० | २९ |
| टक्केवारी | | | २८% | ३१% | ८७% | १३% |

क्षेत्रीय पाहणीमध्ये संशोधन गटाने दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना शासनाच्या विविध विभागांनी दिलेल्या योजना - कर्ज व अनुदान यांचा सखोल अभ्यास केला. या योजनांतर्गत दिलेल्या वस्तूंची प्रत्यक्ष पाहणीही केली त्यावेळी जी माहिती हाती आली तिची सांखिकी आवडेवारी उपरोक्त तक्त्यामध्ये विशद केली आहे. ठाणे जिल्हयातील निवडलेल्या प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरी जावून भेटी दिल्या असता -

१. २८% लाभार्थी आपल्याकडील वस्तू दाखवू शकले. यातील काही लाभार्थ्यांच्या बैलगाडया - बैलजोडया कामाकरिता भाडयाने दिल्या असल्यामुळे तसेच शेळ्या चरावयास नेल्या असल्यामुळे प्रत्यक्ष पहाता आल्या नाही, तसेच ज्यांनी मिळालेले कर्ज भांडवल म्हणून वापरले, काहींनी खते - बी-बियाणे शेतात वापरले, त्यांच्या वस्तूही प्रत्यक्ष बघता आल्या नाहीत.

२. लाभार्थ्यांपैकी ३१% लाभार्थ्यांनी वस्तू सुस्थितीत नाही अशी तक्रार केली.

३. वस्तू असूनही तिच्यापासून उत्पन्नात झपाटयाने वाढ होत नाही. त्यापासून मिळणाऱ्या उउत्पन्नात सातत्य रहात नाही अशी तक्रार केली. उदा. ज्यांना बैलगाडी - बैलजोडी योजना दिली त्यांना आदिवासी भागात फक्त गवताच्या कापणीनंतर तीन महिनेच गाडी भाडयाने देता येते. शेतीची व घरगुती कामे करण्याव्यतिरीक्त उरलेले ९ महिने त्यांना बैलगाडी पासून उत्पन्न तयार करता येत नाही. शेळ्या मिळालेल्या बहुतेक लाभार्थ्यांनी तर या योजनेपासून काहीच फायदा झाला नाही असे सांगितले. वर्षाकाठी एखादा बोकड ३५० ते ४०० रू. ना विकणे अथवा घरी खाणे या पध्दतीने या योजनेचा विनियोग लाभार्थी करीत असल्याचे निदर्शनास आले. मासेमारीकरिता ज्यांना जाळी देण्यात आली त्यापैकी शहापूर तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांनी जाळी तुटून गेल्याचे सांगितले. त्यामुळेच ८७% लाभार्थींनी उत्पन्नात वाढ झाली नाही असे सांगितले.

४. शासकीय योजनांमुळे उत्पन्नात वाढ झाली असे सांगणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या फक्त १३% आढळली. आदिवासी भागात योजना देताना आदिवासींच्या गरजा, उपयुक्तता, त्यामुळे आदिवासींच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता या सर्व बाबींचा सखोल विचार करणे, लाभ दिल्यानंतर काम झाले असे न करता आदिवासी त्या वस्तूंचा लाभ घेतात की नाही हे पहाण्याकरिता त्याचा पाठपुरावा करणे, वस्तू योग्य दर्जाची देणे या बाबतीत त्रुटी राहिल्यास लाभ देवूनही प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या पदरात काय पडते याचे प्रत्यंतर उपरोक्त तक्ता पाहिल्यास लक्षात येते.

तक्ता क्र. ४:११
लाभ घेतलेल्या वस्तुंचे स्थितीनुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | लाभ घेतलेली वस्तु सुस्थितीत नसल्याची कारणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कमी उत्पन्न मिळाले. | सदोष आहे. | देखभालीचा खर्च जास्त. | तातडीची गरज | वस्तु सध्या अस्तित्वात नाही. | वस्तु नाश पावली | वस्तु विकून टाकली. | वस्तु गहाण ठेवली. |
| १ | जव्हार | ७७ | ५ | ७ | २ | १ | ९ | १५ | २ | १ |
| | | | ६% | ९% | ३% | १% | १२% | १८% | १% | १% |
| २ | डहाणू | ४५ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| | | | २% | ० | २% | ० | ० | ० | २% | ० |
| ३ | मोखाडा | ३२ | ० | २ | ० | ० | ० | ६ | ० | ० |
| | | | ० | ६% | ० | ० | ० | १९% | ० | ० |
| ४ | तलासरी | २० | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० |
| | | | ० | ५% | ० | ० | ५% | ५% | ० | ० |
| ५ | शहापूर | २९ | ० | ० | ० | ० | ६ | १४ | ६ | ० |
| | | | ० | ० | ० | ० | २१% | ४८% | २१% | ० |
| ६ | वाडा | २६ | २ | ० | ० | ० | २ | ३ | ० | ० |
| | | | ८% | ० | ० | ० | ८% | ११% | ० | ० |
| एकूण | | २२९ | ८ | १० | ३ | १ | १८ | ३९ | ९ | १ |
| टक्केवारी | | १००% | ३.५% | ४% | १% | ० | ८% | १८% | ३.५% | ० |

विविध योजनांच्या माध्यमातून वस्तू स्वरुपात दिलेला लाभ सुस्थितीत आहे का याची पडताळणी केली असता काही निष्कर्ष हाती आले ते पुढील प्रमाणेः-

१८% या सर्वाधिक लाभार्थ्यांची वस्तू नाश पावली होती. ८% लाभार्थ्यांनी सध्या त्यांच्या जवळ वस्तू अस्तित्वात नाही असे सांगितले. ४ % लाभार्थ्यांनी वस्तू सदोष आहे असे सांगितले. ३.५% लाभार्थ्यांनी काही कारणांनी आपल्याकडील वस्तू विकून टाकली तर तेवढ्याच (३.५ %) लाभार्थ्यांनी काही करणांनी आपल्याकडील वस्तू मिळूनही लाभ न होता कमी उत्पन्न मिळाले असल्याचे सांगितले. मात्र यासर्व लाभार्थ्यांपैकी ओकानेही वस्तू गहाण ठेवली असे नमूद केले नाही.

तक्ता क्र. ४:१२

कर्जफेड व थकबाकीच्या कारणांनुसार लाभार्थींचे वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | लाभार्थ्यांच्या कर्ज परत फेडीबाबतचे मुद्दे | | | थकबाकीची कारणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासबुक मिळाले | रक्कम परतफेड केली | थकबाकीदार | उत्पन्न निर्माण होण्यास विलंब | अपुरे उत्पन्न | वस्तुपासून मदत नाही | अर्धवट लाभ मिळाला. |
| १ | जव्हार | ७७ | ४४ | ४४ | ४२ | ११ | १८ | १८ | ४ |
| | | | ५७% | ५७% | ५४% | १४% | २३% | २३% | ५% |
| २ | डहाणू | ४५ | १९ | २३ | ३४ | १८ | ९ | ५ | १ |
| | | | ४२% | ५१% | ७५% | ४०% | २०% | ११% | २% |
| ३ | मोखाडा | ३२ | १७ | १६ | २९ | १८ | ३ | ८ | ० |
| | | | ५३% | ५०% | ९१% | ५६% | ९% | २५% | ० |
| ४ | तलासरी | २० | १६ | १६ | १० | ३ | १ | १ | ० |
| | | | ८०% | ८०% | ५०% | १५% | ५% | ५% | ० |
| ५ | शहापूर | २९ | २ | ९ | २१ | २ | १ | १७ | ४ |
| | | | ७% | ३१% | ७२% | ७% | ३% | ५९% | १४% |
| ६ | वाडा | २६ | ४ | ६ | ८ | ४ | २ | ० | ० |
| | | | १५% | २३% | ३१% | १५% | ८% | ० | ० |
| एकूण | | २२९ | १०२ | ११४ | १४४ | ५६ | ३४ | ४९ | ९ |
| टक्केवारी | | | ४५% | ५०% | ६३% | २४% | १५% | २१% | ४% |

आधी नमूद केल्याप्रमाणे आदिवासी जनतेला दारिद्र्यरेषेबाहेर काढण्याकरिता, त्यांच्या आर्थिक दर्जात, उत्पन्नात भरीव सुधारणा व्हावी याकरिता शासनाच्या निरनिराळ्या खात्यांमार्फत आदिवासी नागरिकांना जोडधंद्या करिता, स्वयंरोजगाराकरिता कर्ज देण्यात येते. याबाबतची सविस्तर माहिती आधीच्या तक्त्यामधे आली आहेच. या कर्ज मिळालेल्या लाभार्थ्यांची सद्य:स्थिती स्पष्ट करणारी सांखिकी आकडेवारी उपरोक्त तक्ता क्र. ४:१२ मधे आली आहे. या माहितीवरुन असे लक्षात येते की कर्ज मिळालेल्या लाभार्थ्यांपैकी फक्त ४५% लभार्थींकडे कर्ज दिल्याबद्दलचे संबंधित बँकांचे पासबुक पहावयास मिळाले. उर्वरीत ५५% लाभार्थी कर्जाबद्दल ते कसे मिळाले? व किती हप्त्यामध्ये फेडायचे? या बाबत काही माहिती सांगू शकले नाहीत. या लाभार्थ्यांपैकी ६३% लाभार्थी थकबाकीदार आहेत. यापैकी ५०% लाभार्थ्यांची कर्जफेड चालली आहे. हे लाभार्थी थकबाकीदार का राहिले? त्यांना कर्ज परतफेड करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात

याची पहाणी केली असता असे समजले की २४ % लाभार्थ्यांना ज्या रोजगार - व्यवसायाकरिता कर्ज देण्यात आले त्या व्यवसायापासून उत्पन्न निर्माण होण्यास विलंब होतो. व उत्पन्नच उशीरा हातात पडत असल्यामुळे कर्जाची परतफेड करण्यास उशीर होतो. १५% लाभार्थ्यांनी त्यांना ज्या व्यवसायाकरिता कर्ज मिळाले त्यापासून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याचे, अपुरे उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले. या अपुऱ्या उत्पन्नामुळे या लाभार्थ्यांना कर्जफेड करता येत नाही असे सांगितले. २१% लाभार्थ्यांनी त्यांना रोजगार - व्यवसायाकरिता ज्या वस्तू पुरविण्यात आल्या त्यापासून उत्पन्नात काहीही वाढ झाली नाही. उलट कर्जमात्र अंगावर पडले असे सांगितले. तर ४% लाभार्थ्यांनी कर्जातून दिलेल्या वस्तूंपासून अर्धवट लाभ मिळाला असल्याचे सांगितले. या सर्व थकबाकीदारांशी अनौपचारिक चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की बरेच थकबाकीदार हे सर्व कर्ज माफ होईल या आशेवर कर्ज फेडत नाहीत. या आधी बरेचदा शासनाने कर्ज माफी जाहिर केली असल्यामुळे आताही कर्जमाफी मिळेल अशी शक्यता त्यांना वाटते. बऱ्याच लाभार्थ्यांनी या सर्व प्रकारात शासनाने कर्ज माफी दिल्यामुळे भूतकाळात कर्ज फेडणारे मूर्ख ठरल्याचे सांगितले. कर्ज फेडून आपण चूक करू आणि शासन नंतर कर्ज माफ करेल त्यापेक्षा कर्जमाफ व्हायची वाट पहाण्याची भूमिका आता बहुतेक लाभधारक घेत असल्याचे लक्षात आले. शासनाच्या मधेच कर्ज माफ करण्याच्या निर्णयाचा आदिवासी नागरिकांवर कसा परिणाम होतो याचे प्रत्यंतर या अनौपचारिक चर्चेमधून मिळाले. त्यामुळे ग्रामसेवक अथवा बँकांच्या अधिकाऱ्यांनी या लाभार्थ्यांकडे कर्ज फेडीचा घोष चालवला तरी त्यांचे म्हणणे कोणी गंभीरपणे घेत नसल्याचे काही ग्रामसेवक व बँक अधिकाऱ्यांनी सांगितले.

तक्ता क्र ४:१३

कार्यान्वियन अधिकाऱ्यांच्या भेटी व केलेले मार्गदर्शन या नुसार लाभधारकांचे वर्गीकरण

| अ.क्र. | तालुके | एकूण लाभार्थी | अधिकाऱ्याच्या स्थान भेटी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भेट दिली नाही. | भेट दिली व मार्गदर्शन केले. | भेट दिली व मार्गदर्शन केले नाही. | सल्ला आचरणात आणला. |
| १ | जव्हार | ७७ | १४ | २६ | ३७ | ३८ |
| | | | १८% | ३४% | ४८% | ४९% |
| २ | डहाणू | ४५ | ५ | २९ | १० | १९ |
| | | | ११% | ६४% | २२% | ४२% |
| ३ | मोखाडा | ३२ | ६ | १२ | १२ | ६ |
| | | | १८% | ३७% | ३७% | १८% |
| ४ | तलासरी | २० | १ | ५ | १४ | ८ |
| | | | ५% | २५% | ७०% | ४०% |
| ५ | शहापूर | २९ | २१ | ० | ८ | ० |
| | | | ७२% | ० | २८% | ० |
| ६ | वाडा | २६ | ६ | ७ | १३ | ६ |
| | | | २३% | २६% | ५०% | २३% |
| | एकूण | २२९ | ५३ | ७९ | ९४ | ७७ |
| | टक्केवारी | १०० | २३% | ३५% | ४१% | ३४% |

उपरोक्त तक्ता आदिवासी भागामधे विविध शासकिय अधिकारी योजनांचे वाटप करण्याचे संदर्भात, तसेच योजनांपासून आदिवासींना लाभ होतो आहे अथवा नाही याचा पाठपुरावा करण्याकरिता स्थान भेटी देतात किंवा कसे याबाबतची माहिती दर्शविणारा आहे. ठाणे जिल्हयातील जव्हार, डहाणू, मोखाडा, तलासरी, शहापूर, वाडा या सहा तालुक्यांना संशोधन गटाने भेट दिली असता व लाभार्थ्यांशी चर्चा केली असता २३% लाभार्थ्यांनी लाभ दिल्यानंतर ती वस्तू कशी वापरात आणली जाते यासाठी अधिकारी भेट देत नाहीत असे नमूद केले. ३५% लाभार्थ्यांनी लाभ दिल्यानंतर अधिकाऱ्यानी भेट दिली व मार्गदर्शन केले असे सांगितले. ३४% लाभार्थ्यांनी भेट दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी दिलेला सल्ला प्रत्यक्ष आचरणात आणला असे सांगितले. तर ४१% लाभार्थ्यांनी लाभ दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी भेट दिली मात्र सल्ला दिला नाही किंवा आदिवासींच्या समस्या समजून घेवून मार्गदर्शन केले नाही असे सांगितले. तालुकास्तरावरील आकडेवारी पाहिली असता शहापूर तालुक्यातील अधिकाऱ्यांचा आदिवासी जनतेशी असलेला संपर्क सर्वात कमी असल्याचे जाणवले. जवळजवळ ७२% लाभार्थ्यांनी या भागात शासकिय अधिकारी येतच नाहीत असे सांगितले. तर २८% लाभार्थ्यांनी अधिकारी आले पण आमच्याशी बोलले नाहीत, आम्हाला कोणतेही मार्गदर्शन केले नाही असे सांगितले. क्षेत्रिय पहाणीच्या वेळी अनौपचारिक चर्चेतही शहापूर येथील लाभार्थ्यांनी आमच्या भागात शासकिय अधिकारी का येत नाहीत? आम्हाला विविध योजनांची माहिती का देत नाहीत? अशी जोरदार पृच्छा केली. संशोधन गटाच्या भेटीमुळे अशा योजना अस्तित्वात असल्याचे समजले असे काही पाडयावरील आदिवासींनी सांगितले. या पार्श्वभूमीवर डहाणू, मोखाडा व जव्हार भागातील अधिकाऱ्यांचा जनतेशी असलेला संपर्क चांगला असलयाचे जाणवले. विशेषत: डहाणू तालुक्यामधे ६४% लाभार्थ्यांनी अधिकारी इथे वरचेवर येत असल्याचे, मार्गदर्शन करीत असल्याचे सांगितले. क्षेत्रिय पहाणीमधे संशोधन गटाला डहाणू तालुक्यातील गट विकास अधिकारी व आदिवासी नागरिकांमधील संवाद, एकमेकांशी असलेला संपर्क चांगला असल्याचे निदर्शनास आले. जव्हार, मोखाडा तालुक्यामध्येही वरील बाबीचे प्रत्यंतर आले. तलासरी भागातील खराब रस्ते, दूर दूर अंतरावरील पाडे व अतिशय विरळ वस्ती या समस्यांमुळे अधिकाऱ्यांना वारंवार भेटी देण्यास त्रास होत असल्याचे लक्षात आले. विशेषत: पावसाळ्यामधे संपर्क पूर्णत: नष्ट होतो असे अधिकाऱ्यांनी सांगितले. तरीही २५% लाभार्थ्यांनी अधिकारी भेट देतात, मार्गदर्शन करतात असे सांगितले. पण ७०% लाभार्थ्यांनी अधिकारी मार्गदर्शन करीत नसल्याची तक्रार केली. अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा जव्हार (४९%) डहाणू ४२%, तलासरी ४०%, मोखाडा १८% येथील लाभार्थ्यांनी सल्ला आचरणात आणला असल्याचे समजले. शहापूर येथे मात्र अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शना अभावी सल्ला आचरणात आणाणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण शून्यावर राहिले असल्याचे दृगोचर होते.

तक्ता क्र. ४:१४

लाभार्थ्यांना योजनेची माहिती

| अ.क्र. | दिलेला लाभ | एकूण | एकात्मिक ग्रामीण विकास योजना | न्युक्लिअस बजेट | कृषी व सलग्न सेवा | आदिवासी विकास महामंडळ |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | बैलगाडी | ११ | १० | ० | ० | १ |
| २ | बैलजोडी | ३९ | ३६ | ० | १ | २ |
| ३ | बैलगाडी, बैलजोडी | ६१ | ५१ | ० | १ | ९ |
| ४ | विटभट्टी | १ | १ | ० | ० | ० |
| ५ | भाजीपाला | ३ | ३ | ० | ० | ० |
| ६ | दुकान | १६ | १५ | १ | ० | ० |
| ७ | ऑईल इंजिन | ५ | १ | २ | २ | ० |
| ८ | मस्त्यपालन | ११ | ११ | ० | ० | ० |
| ९ | शिलाई मशीन | ९ | ७ | २ | ० | ० |
| १० | सुतार कामासाठी हत्यारे | ४ | ४ | ० | ० | ० |
| ११ | स्पीकर व मंडप | ६ | ५ | १ | ० | ० |
| १२ | बुरूडकाम | २ | २ | ० | ० | ० |
| १३ | शेळीपालन | ३४ | ३४ | ० | ० | ० |
| १४ | विहीर | १४ | १२ | ० | २ | ० |
| १५ | गोबरगॅस | ६ | ६ | ० | ० | ० |
| १६ | बेंजोपार्टी | ४ | ४ | ० | ० | ० |
| १७ | चमचा पॉलीश | १ | १ | ० | ० | ० |
| १८ | न्हावी काम - केस कापण्याचे साहित्य | १ | १ | ० | ० | ० |
| १९ | म्हैस | २ | २ | ० | ० | ० |
| २० | इलेक्ट्रीक मोटर पंप | ४ | २ | १ | १ | ० |
| २१ | गवंडीकाम | १ | १ | ० | ० | ० |
| २२ | बि-बियाणे | १ | ० | १ | ० | ० |
| २३ | बायोगॅस | २ | ० | २ | ० | ० |
| २४ | फळबाग योजना | १ | ० | ० | १ | ० |
| २५ | खते | २ | ० | ० | २ | ० |
|  | एकूण | २४१ | २०९ | १० | १० | १२ |
|  | टक्केवारी |  | ९१% | ४.३६% | ४.३६% | ५% |

वरील तक्ता क्र. ४:१४ चे विश्लेषण केले असता २२९ लाभधारकांना २४१ वस्तूंचे वाटप झाल्याचे आढळून आले. याचा अर्थ १२ लाभधारकांना दोन - दोन लाभांचा फायदा झाला आहे.

१. एकात्मिक ग्रामीण विकास योजने अंतर्गत सर्वाधिक २०९ (९१%) लाभधारकांनी लाभ घेतल्याचे आढळून आले. न्यूक्लिअस बजेट योजने अंतर्गत १० लाभार्थींनी (४:३६%) लाभ घेतला, कृषी व संलग्नसेवा योजने अंतर्गत १० लाभार्थ्यांना ४.३६% लाभ झाल्याचे आढळून आले. आदिवासी विकास महामंडळ यांचे मार्फत १२ लाभधारकांना ५% लाभ झाल्याचे आढळून आले.

२. बैलगाडी व बैलजोडीचा लाभ दिलेले सर्वात जास्त ६१ (२६%) लाभार्थि आढळून आले. यामध्ये 'एकात्मिक ग्रामिण विकास योजने' अंतर्गत , ' कृषी व संलग्न सेवा' योजने अंतर्गत व ' आदिवासी विकास महामंडळ' यांचे अंतर्गत हा लाभ दिल्याचे आढळून आले. त्या खालोखाल ३९ लाभधारकांना बैलजोडीचा लाभ दिल्याचे आढळून आले. हाच लाभ 'कृषी व संलग्न सेवा',' आदिवासी विकास महामंडळ' यांचे मार्फतही दिल्याचे आढळून आले. त्यानंतर ३४ लाभधारकांना शेळी पालन या व्यवसायासाठी ११ शेळ्यांचा गट दिल्याचे आढळून आले.

३. ठाणे जिल्ह्यातील उपयोजना क्षेत्रातील विविध योजनांचा व निवडलेल्या लाभधारकांचा अभ्यास केला *असता एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत ९१% लाभधारकांनी लाभ घेतला. ४.३६% लाभधारकांनी न्यूक्लीअस* बजेट अंतर्गत, ५% लाभधारकांनी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना घेतल्याचे आढळून आले.

## प्रकरण क्र. ५

## निष्कर्षात्मक बाबी

क्षेत्रीय पाहणीत निवडलेल्या ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, डहाणू, तलासरी, शहापूर, वाडा या सहा तालुक्यातील लाभार्थींसंबंधी गोळा केलेल्या माहितीच्या आधारे खालील बाबी निदर्शनास आल्या.

सर्वसाधारण निष्कर्ष:-

१. पाहणीसाठी निवडलेल्या २२९ लाभार्थींपैकी १६६ ( ७१.५%) लाभार्थी दुय्यम व्यवसायात गुंतलेले आढळले. यातील बहुसंख्य लाभधारक शेतमजूरी हा दुय्यम व्यवसाय करतात.

२. जमिनीचे धारण क्षेत्रानुसार वर्गीकरण केले असता १८% लाभार्थी भूमिहिन असल्याचे आढळले. व ९२% लाभार्थीकडे १ एकर पर्यंत पडीक जमीन असल्याचे आढळले.

३. ९१% लाभार्थ्यांना एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत लाभ दिला गेला. ४.३६% लाभार्थ्यांना न्यूक्लिअस अजेट अंतर्गत, ४.३६% लाभार्थ्यांना कृषी व संलग्न सेवा अंतर्गत लाभ झाल्याचे आढळून आले. तसेच आदिवासी विकास महामंडळ यांचेमार्फत राबविल्या गेलेल्या योजनांचा ५ टक्के लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

४. एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत दुभत्या जनावरांचे तसेच कृषि व संलग्न सेवा अंतर्गत दुग्धविकास विभागामार्फतही दुभत्या जनावरांचे वाटप करण्यात येते. या योजनांमुळे लाभधारकांच्या उत्पन्नात निश्चित स्वरूपाचा बदल होतो.

तथापी ठाणे जिल्ह्यातील निवडलेल्या लाभधारकांना या योजनांचा लाभ झाल्याचे आढळून आले नाही. कार्यान्वयीन अधिकारी ह्यांची मुलाखत घेतली असता 'या जनावरांना चारा व पाणी याचा प्रश्न निर्माण होतो. पर्यायाने ही जनावरे ह्या भागात टिकत नाहीत असे मत दिले.'

५. एकात्मिक ग्रामीण विकास योजनांचा लाभ घेण्याच्या प्रयत्नात असताना लाभधारकांना तांत्रिक अडचणी उद्‌भवल्या. उदा. वडिलोपार्जित जमिनीची खातेफोड नसणे, दारिद्र्य रेषेखालील यादीत समावेश नसणे तसेच ग्रामसेवकामार्फत फॉर्म भरुन दिल्यानंतर चौकशीसाठी वारंवार तालुक्याच्या गावी जावे लागणे इत्यादी.

६. लाभ झालेल्या वस्तुच्या वापरासंबंधी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

तथापि पाहणीमध्ये ठाणे जिल्ह्यातील ९६% लाभधारकांना तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन मिळत नसल्याचे आढळून आले. पर्यायाने दिलेल्या लाभाचा पुरेपूर व व्यवस्थित वापर होवू शकत नाही.

७. पाहणीमध्ये ठाणे जिल्ह्यातील निवडलेल्या लाभार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार ९१% लाभार्थींना एकात्मिक ग्रामीण विकास योजने अंतर्गत लाभ झाला. यामध्ये गोबरगॅस, बैलगाडी, बैलजोडी, बुरूडकाम, विहीर या १००% अनुदान असलेल्या योजनांचा लाभ झाला. १५७ लाभधारकांना ( ७५%) ५०% अनुदान असलेल्या योजनांचा लाभ झाला. यामध्ये बैलगाडी, बैलजोडी, सुतारकामाची हत्यारे, शेळीपालन, गोबर गॅस, बेंजोपार्टी, विद्युतपंप, व किराणा दुकान यांचा समावेश होतो.

८. १४१ (५८%) लाभधारकांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत विविध योजनांसाठी कर्ज पुरवठा झाला. ४२ (१८%) लाभधारकांना सहकारी बँकेकडून कर्जपुरवठा झाला व ३१ (१३%)लाभधारकांना शेड्यूल बँकेकडून कर्जपुरवठा झाल्याचे पाहणीत आढळून आले.

९. ठाणे जिल्ह्यातील विविध योजना मिळालेल्या लाभधारकांच्या वयोगटाची पाहणी केली असता ५०% लाभार्थी हे २६ ते ४० वयोगटातील आढळले व २५% लाभधारक ४१ ते ५० या वयोगटातील आढळले.

१०. लाभ दिल्यानंतर दिलेल्या लाभाचा उपयोग लाभधारक करतात किंवा कसे याबाबतची पडताळणी बँकेचे कर्मचारी तसेच कार्यान्वयीन अधिकारी यांचेकडून होणे अपेक्षित आहे. तथापि अशाप्रकारे पडताळणी होत नसल्याचे आढळून आले.

११. लाभधारकांनी त्यांचेसाठी असलेले विविध योजनांची माहिती मिळते का? व मिळत असल्यास कोणाकडून? याबाबत प्रत्यक्ष लाभधारकांशी चर्चा केली असता ८७% लाभधारकांनी ग्रामसेवकांकडूनच योजनांची माहिती मिळते, व योजनेसाठी आवश्यक असणारे कागदपत्र तयार करण्याचे काम ग्रामसेवकच करतो. असे मुलाखतीत सांगितले.

१२. बैलगाडी व बैलजोडी या योजनेचा लाभ दिलेले सर्वात जास्त ४६% लाभार्थी आढळून आले. यासाठी एकात्मिक ग्रामीण विकास योजना, कृषि व संलग्न सेवा व आदिवासी विकास महामंडळ यांचे अंतर्गत या प्रकारचा लाभ दिला गेल्याचे आढळून आले.

एकच योजना तिन वेगवेगळया विभागांमार्फत वेगवेगळया पध्दतीने राबविली जात असल्याचे आढळले.

१३. एकात्मिक ग्रामीण विकास योजनांतर्गत २०९ लाभधारकांनी लाभ घेतला. न्यूक्लिअस बजेट योजनेअंतर्गत १०, कृषि व संलग्न सेवा अंतर्गत १० व आदिवासी विकास महामंडळाकडून राबविल्या गेलेल्या योजनेचा १२ लाभधारकांनी लाभ घेतला.

यामध्ये काही लाभधारकांनी दोन, तीन योजनांचा लाभ घेतल्याचे आढळून आले.

१४. एकात्मिक ग्रामीण विकास योजनांतर्गत शेळीपालन या व्यवसायासाठी ११ शेळ्यांचा गट देण्यात येतो. शेळ्यांचा विमा उतरविण्यात येतो तथापि विमा उतरविण्याची कल्पना लाभधारकांना देण्यात येत नाही. त्यामुळे शेळया रोगाने मृत्यूमुखी पडल्यास अथवा अन्य कारणाने दगावल्या तरी लाभधारक विम्याचे पैसे घेण्यासाठी पुढे येत नसल्याचे पाहणीत आढळून आले.

१५. न्यूक्लिअस बजेट योजनेअंतर्गत लाभ दिलेल्या लाभधारकांपैकी ५०% लाभधारकांच्या उत्पन्नात वाढ न होण्याची कारणे जाणून घेतली असता:-

गावात शिलाई मशीन पुष्कळ असल्याने शिलाई व्यवसाय तितकासा चालत नाही, बायोगॅस बंद असणे इत्यादी तांत्रिक अडचणींमुळे उत्पन्नात वाढ होत नसल्याचे आढळून आले.

१६. ऑईल इंजिन, लावूड स्पीकर, बेंजोपार्टी, सुतारकामाची हत्यारे, स्पीकर व मंडप, गवंडीकाम, किराणा दुकान या योजनांमुळे लाभधारकांना खूप मोठा आर्थिक फायदा झाला व उत्पन्नात वाढ होत असल्याचे लाभधारकांनी सांगितले.

१७. कृषी व संलग्न सेवा अंतर्गत विहीर, इलेक्ट्रीक मोटर पंप व फळबाग लागवडीसाठी रोपे असा संच पुरविण्यात येतो. या माध्यमातूनही लाभधारकांच्या उत्पन्नात वाढ होत असल्याचे आढळून आले.

याची कारणे जाणून घेतली असता दुबार पिके घेणे शक्य झाल्यामुळे उत्पन्नात वाढ होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगीतले. ही योजना फारच उपयुक्त असल्याचे आढळून आले.

१८. आदिवासी विकास महामंडळामार्फत १२ लाभधारकांना योजनांचे वाटप झाले आहे, पैकी ३ लाभधारकांच्या (२५%) उत्पन्नात वाढ झाली. उर्वरीत ९ (७५%) लाभधारकांचे उत्पन्न न वाढण्याचे कारण काय असावे हे जाणून घेतले असता ७ लाभधारकांना बैलगाडी व बैलजोडी ही योजना देण्यात आलेली आहे व त्यापासून केवळ सीझन मध्येच फायदा होतो.

१९. सर्वात जास्त योजनांचा फायदा घेणाऱ्यांमध्ये वारली जमातीचा सहभाग सर्वात जास्त होता. एकूण लाभधारकांपैकी ४५% वारली जमातीच्या लाभार्थ्यांनी या योजनांचा फायदा घेतला. त्याखालोखाल १४% कोकणा या जमातीस योजनांचा फायदा मिळाला.

अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट नसलेली 'भोई'जातीच्या काही लाभधारकांनी आपण अनुसूचित जमातीचे आहोत असे सांगून लाभ मिळविल्याचे उदाहरण ठाणे जिल्ह्यामध्ये आढळून आले.

२०. पाहणीमध्ये २२९ लाभधारकांपैकी फक्त ३१ (१३%) लाभधारकांच्या शेतीसाठी पाण्याची सोय असल्याचे आढळून आले.

२१. पाहणीमध्ये काही ठिकाणी आदिवासींच्या गरजा लक्षात घेवून लाभ दिल्याचे आढळून आले नाही. उदा. बेंजोपार्टी, चमचा पॉलीश. डहाणू तालुक्यातील दोन लाभधारकांनी हे सर्व साहित्य जपून ठेवल्याचे निदर्शनास आले. तसेच स्पीकर देण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी स्पीकर घरात सांभाळून ठेवल्याचे आढळून आले.

पर्यायाने या योजना देवूनही लाभार्थ्यांच्या उत्पन्नात नगण्य वाढ झाली आहे.

२२. ठाणे जिल्ह्यातील १५% आदिवासी लाभार्थ्यांना एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत शेळीगट किंवा शेळ्या देण्यात आल्या आहेत. आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने ही योजना फारशी लाभदायक नसलयाचे आढळून आले. याचे कारण वर्षाकाठी एखादा बोकड तयार होवून तो ३५० ते ४५० रूपयांपर्यंत विकला जातो. बरेचदा या शेळ्या रोग पडून किंवा खुद्द लाभार्थ्यांकडून कापूर खाल्ल्या जातात.

त्यामुळे आर्थिक वाढीच्या दृष्टीने संशोधन गटाला ही योजना उपयुक्त वाटली नाही.

२३. क्षेत्रीय पाहणीमध्ये लाभधारकांच्या मुलाखती घेत असताना विविध योजनांसाठी कर्जघेतलेले लाभार्थी शासनाकडून भविष्यात कधीतरी कर्ज माफ होईल या आशेवर कर्जफेड करीत नसल्याचे आढळून आले. एखाद्या योजनेच्या अंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड लाभार्थ्यांनी केल्यास त्यांना त्वरीत दुसऱ्या योजनेची हमी दिल्यास तो कर्जफेड करण्यास उद्युक्त होतो.

२४. निरक्षरतेमुळे बऱ्याच लाभार्थ्यांना कागदपत्र व्यवस्थित ठेवलेले नसल्याचे व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करता येत नसल्याने लाभार्थी कृषी व संलग्न सेवा योजनेअंतर्गत असलेल्या योजनांचा लाभ घेवू शकत नसल्याचे आढळून आले.

२५. सर्व योजना आदिवासींच्या कल्याणार्थ असल्या तरी त्यातील काही योजनांमुळे आदिवासींची आर्थिक उन्नत्ती होवू शकत नाही. उदा. मत्स्यपालन, शेळीपालन, बेंजोपार्टी, चमचा पॉलीश इत्यादी.

२६. आदिवासींमध्ये संघटनेचा अभाव असल्याने विवधि योजनांची माहिती आदिवासींना होत नाही.

२७. ठाणे जिल्ह्यातील उपयोजना क्षेत्रातील लाभार्थींना लाभ दिल्यानंतर ९१% लाभार्थ्यांचे (२०९लाभधारकांचे) उत्पन्न वाढल्याचे आढळून आले. उर्वरीत लाभधारकांच्या उत्पन्नात लाभ न होण्याची कारणे जाणून घेतली असता लाभधारकांनी सांगितले की, बैलगाडी गवत कापण्याच्या हंगामामध्ये भाड्याने लावता येते. काही लाभधारकांना बैल रोगाने दगावल्यास उत्पन्नात वाढ झाली नाही, भाजीपाला व्यवसाय पावसाळ्यात बंद करतात. शेळ्या रोगाने दगावल्यास, मत्स्यपालन व्यवसायमध्ये पुरविण्यात आलेल्या जाळ्या निकृष्ट प्रतीच्या असल्याने त्या तुटून गेल्या.

या कारणांमुळे लाभ देवूनही आर्थिक उत्पन्नात वाढ झाली नाही असे लाभधारकांच्या मुलाखती घेतल्या असता आढळून आले.

वरील अभिप्रायां व्यतिरिक्त / निष्कर्षाव्यतिरिक्त प्रतिनिधीक तत्वावर राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा व्यवस्थापकांच्या व शासकीय कार्यान्वियन अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या असता संशोधन गटास पुढील माहिती हाती आली.

१. कर्ज पासबुक :-

५०% अनुदान व तितकेच कर्ज अशा स्वरुपातील योजनांना लाभधारकास बँकेमार्फत दिले जाणारे कर्ज जमा झाल्याचा निदर्शक म्हणून पासबूक दिले जाते. यावर कर्जाच्या वसुलीची नोंद घेतली जाते. असे बँक अधिकारी / शाखा व्यवस्थापकांचे अभिप्राय आहेत.

तथापी पाहणीमध्ये अशी वस्तुस्थीती निदर्शनास आली की, आपल्या खात्यावर बँकेचे कर्ज जमा होते व त्यासाठी पासबूक देण्यात येती याची माहिती बहुसंख्य लाभधारकांना नाही. काही वेळा कर्ज फेडीच्या अनिश्चितेमुळे बँक अधिकारी मंजूर झालेल्या रकमेतील ठराविक रक्कम आधिच कापून घेवून उर्वरीत रक्कम खात्यावर टप्प्या-टप्प्याने जमा करतात. या नमूद केलेल्या बाबींबाबत लाभधारक अज्ञानात असतो.

२. लाभधारक कर्जाचे थकबाकीदार :-

मुलाखतीत लाभधारक मोठ्या प्रमाणावर कर्जाचे थकबाकीदार राहात असल्याचे बँक अधिकारी व कार्यान्वियन अधिकारी यांनी नमूद केले. ही थकबाकीची कारणे काय असावित याची कारणे सांगताना कार्यान्वियन अधिकाऱ्यांनी विषद केले की:-

अ. दिलेल्या लाभापासून कष्ट घेवून उत्पन्न काढीत नाहीत.

ब. कातकरी योजनेतील लाभधारकांचे वारंवार स्थलांतर.

क. सरकारी पैसा आहे तो भरण्याची गरज नाही अशी २५% लाभधारकांची बेफिकीर वृत्ती.

ड. शासनाने यापूर्वी कर्जमाफी केली आहे. यापुढेही कर्ज मा फी होईल . या हेतूने थकबाकीचे प्रमाण अधिक.

इ. आर्थिक परिस्थीती अत्यंत कमकुवत.

फ. लाभ नाश पावतो.

ग. लाभापासून उत्पन्न वाढण्याऐवजी कर्जच वाढत जाते.

३. दिलेल्या लाभाची पाहणी :-

लाभधारकांना वाटप झालेल्या लाभाची त्यांचे घरी जावून पाहणी करता का याबाबत विचारणा केली असता सर्व कार्यान्वयन अधिकारी व शाखा व्यवस्थापकांनी लाभाची पाहणी करीत असल्याचे सांगीतले.

तथापी लाभधारकांनी मात्र बँकेचे अधिकारी केवळ वसूलीसाठी येतात व शासकीय अधिकारी लाभ दिल्यानंतर इकडे फिरकतनाहीत. ग्रामसेवकांव्यतिरीक्त अन्य कोणीही दखल घेत नसलयाचे पाहणीत आढळले.

विविध योजनांचे नियोजन आदिवासींसाठी आहे याची माहिती शहापूर तालुक्यातील आदिवासींना नाही. शासकीय अधिकारी व ग्रामसेवक ( बी.डी.ओ. कार्यालयातील अधिकारी ) यांचा ग्रामस्थांशी संपर्क नसल्याचे पाहणीत आढळून आले. केवळ प्रकल्प अधिकारी स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या योजनांची व प्रशिक्षणांची माहिती काही सुशिक्षीत आदिवासी युवक व अन्य लाभधारकांना असल्याचे निदर्शनास आले.

४. लाभ मिळूनही उत्पन्नात वाढ न होण्याची कारणे :-

लाभ दिल्यानंतर लाभधारकांचे उत्पन्न वाढावे व लाभधारकाची आर्थिक परिस्थिती सुधारावी अशी शासनाची अपेक्षा आहे. तथापी सगळ्यांच्याच उत्पन्नात वाढ होते असे नाही. याची कारणे जाणून घेतली असता कार्यान्वयन अधिकारी यांनी सांगीतले की :-

अ. मिळणारे लाभ घरगूती कामासाठी वापरतात. लाभाचा पूर्ण उपयोग करून घेता येत नाही. उत्पन्न मिळाल्यास घरातच खर्च केले जाते.

ब. मिळालेल्या लाभामूळे पूर्ण काळ रोजगार उपलब्ध होत नाही. कौटुंबिक कामाकरिताच फक्त मिळालेल्या साधनांचा वापर होतो.

क. लाभार्थींना वर्षभर स्थानिक रोजगार मिळत नाही, त्यामुळे स्थलांतर करतात. साधनांमध्ये पुरेसे उत्पन्न देण्याची हमी नाही, त्यामुळे साधनांबाबत उत्पन्न मिळविण्यामध्ये उदासिनता असते.

ड. कृषी व संलग्न सेवा अंतर्गत विहिरींना पाणी न लागल्यानेही उत्पन्न वाढत नाही.

इ. वाढलेल्या उत्पन्नामधून कर्जाची परतफेडच करावी लागते. पर्यायाने कुटूंबाची आर्थिक परिस्थिती उत्पन्न वाढूनही 'जैसे थे' सारखीच राहते.

५. कर्ज प्रकरणापासून लाभ हातात पडावयास लागणारा कालावधी:-

लाभधारकाने एखाद्या वस्तूचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केल्यापासून साधारण किती दिवसात लाभ हातात पडतो याची माहिती घेतली असता -

अर्ज केल्यापासून एक महिन्याच्या आंत लाभ हातात पडतो अथवा कर्ज प्रकरण मंजूर होते असे शाखा व्यवस्थापकांनी सांगितले. तर आय.आर.डी.पी. अंतर्गत असणाऱ्या योजना दोन महिने कलावधीत मिळतात. गोठ्या स्वरूपातील योजना ८ ते १० महिने या कालावधीपर्यंत मिळतात.

योजना हातात पडेपर्यंतचा निश्चित कालावधी नाही. आर्थिक वर्ष संपताना उद्दीष्ट पूर्तीसाठी योजना त्वरीत मंजूर होवून लाभधारकांच्या हातात पडतात असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

६. योजनांसाठी प्रतिसाद :-

कोणत्या प्रकारच्या योजनांना लाभधारक चांगला प्रतिसाद देतात व कोणत्या प्रकारच्या योजनांना अल्प प्रतिसाद मिळतो कार्यान्वयन अधिकाऱ्यांकडून ही माहिती जाणून घेतली असता ज्या लाभधारकांचे धारण क्षेत्र जास्त आहे असे लाभधारक कृषी व संलग्न सेवा अंतर्गत असणाऱ्या कृषी योजनांना ( बैलगाडी, बैलजोडी, विद्युतपंप, जिवनधारा, निर्धूरचुली, विहीर, गोबरगॅस प्लँट ) चांगला प्रतिसाद देतात. व ज्यांचे धारण क्षेत्र लहान आहे असे लाभधारक १००% अनुदान असणाऱ्या आय.आर.डी.पी. च्या योजनांना चांगला प्रतिसाद देतात.

टिकावू स्वरूपातील लाभ घेण्यासही लाभधारक आपण होवून पुढे येत असल्याचे कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी सांगितले. उदा. बेंजोपार्टी, किराणादुकान, लाउडस्पीकर. यामुळे उत्पन्नातही निश्चित वाढ होते. असे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

७. योजनांची कार्यक्षमता वाढविणे - योजनेत अपेक्षीत बदल :-

सध्या अस्तीत्वात असणाऱ्या वेगवेगळ्या विभागांच्या योजना अधिक उपयुक्त होवून त्यांची कार्यक्षमता कशी वाढेल या संदर्भात अधिकाऱ्यांच्या मतांची नोंद घेतली असता पुढील अभिप्राय व्यक्त केले.

अ. भौगोलिक परिस्थीतीनुसार योजनेचे निकष बदलावेत.

ब. कृषी उत्पादनास स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध होणे जरुरीचे आहे.

क. पारंपारीक व्यवसायांना चालना देवून वस्तुंचे विक्रीची स्थानिक व्यवस्था करावयास पाहिजे.

ड. नविन नविन योजनांचा अंतर्भाव असावा. उदा. नांगराचे नविन प्रकार, लघुउद्योग, गृहउद्योग यासारख्या योजना असाव्यात.

इ. दशलक्ष विहिरींचा कोटा वाढवून मिळावा. पर्यायाने अधिक लाभधारक याचा लाभ घेतील.

फ. बँकेकडून लाभधारकांना डिपॉझीटसाठी अडवणूक केली जाते. पर्यायाने लाभधारक डिपॉझीटची रक्कम भरु न शकल्याने लाभापासून वंचित रहातात.

ग. कोटेशन मागविताना दुकानदार १५ ते २०% कमिशन घेतो. जास्त किंमत लावतो. म्हणून लाभार्थीस लाभ/साधन महाग पडते. यासाठी कोटेशन सक्तीने असावे. फार तर बँकेने साधन स्वस्त आहे याची खात्री करून घ्यावी.

ह. खातेफोड होणे गरजेचे आहे. जमीन धारणा जास्त दिसून येत असल्याने बँका कर्ज देत नाहीत.

मोठ्या मोठ्या योजनांच्या अनुदानात वाढ करण्यात यावी.

वरील अभिप्राय कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी दिल्याचे आढळून आले.

८. आदिवासींचा सहभाग वाढविणेची गरज :-

योजनांच्या अंमल बजावणीमध्ये आदिवासींचा सहभाग अधिक कसा वाढविता येईल व यासाठी काय प्रयत्न करता येईल, याबाबत कार्यान्वयन अधिकाऱ्यांची मते पुढील प्रमाणे -

अ. आदिवासींना साक्षर करून शासकीय योजनांबाबत लोक जागृती निर्माण करण्याची करज. तसेच योजनांचे महत्व पटवून देण्याची गरज आहे.

ब. दिलेल्या साधनांची संपूर्ण उत्पन्न निघेपर्यंत शासनाचा सहभाग हवा.

क. शेतीवरील उत्पादनात मोठ्या प्रमाणात प्रात्यक्षिके करून योजनांची माहिती परिपूर्ण देवून प्रकल्प आदिवासी वस्तीत तयार करावेत.

ड. योजनांचा प्रसार विविध माध्यमातून झाल्यास योजनांचे स्वरूप आदिवासींना समजेल.

इ. स्थानिक नैसर्गिक गरजांवर आधारीत योजना तयार करण्यात याव्यात.

९. विशेष सुचना :-

आदिवासींसाठी असणाऱ्या विविध योजनांबाबत विशेष काय सुचना सुचवाव्याशा वाटतात याबाबत शाखा व्यवस्थापक शासकीय अधिकाऱ्यानी खालील सुचना सुचविलया -

अ. मिनी ट्रक्टरसाठी शेती धारण क्षेत्राची मर्यादा ५ एकर वरून १० एकर पर्यंत आणावी. याचे कारण विचारले असता प्रकल्प अधिकाऱ्यानी सांगितले की, मिनी ट्रक्टर योजनेचे उद्दिष्ट एका वर्षात दोन ट्रक पुरविण्याचे आहे. तथापी ५ एकर पर्यंत जमिन धारणा असणारे पुष्कळ आदिवासी लाभधारक आहेत. हे बहुसंख्य लाभधारक या योजनेसाठी इच्छूक असतात. यासाठी ५ एकर ही धारण क्षेत्राची मर्यादा वाढवून १० एकरवर न्यावी.

ब. स्थानिक पातळीवर वर्षभर श्रमिक योजना तयार करून आदिवासींचे स्थलांतर थांबविणे की, जेणेकरून मुलांचे शिक्षण आपोआप होईल.

क. लाभार्थींचे गरजेनुसार योजनेत बदल करण्याचे अधिकार तालुका पातळीवर विकेंद्रित व्हावेत.

ड. किमान १ महिनातरी लघुउद्योगाचे प्रशिक्षण द्यावयास हवे. उदा. बुरूडकाम, सायकल रिपेअरींग, तत्सम रिपेअरींग इ. तसेच पत्रावळी, द्रोण या योजनांचे प्रशिक्षण देवून याही योजना आदिवासी लाभधारकांना देण्यात याव्यात.

# प्रकरण क्र. ६

## सुचना तथा शिफारसी

१. पडीक जमीन सुधारणा व उपाययोजना :-

आदिवासी भाग डोंगराळ असलयाने पावसाचे प्रमाण जास्त असते. तसेच जमिन डोंगर उतारावरील असल्याने जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप होते. ठाणे जिल्ह्यात पाहणी मध्ये निवडलेल्या लाभार्थींच्या एकूण जमिनीपैकी ६% जमिन पडिक असल्याचे आढळले. अशा पडिक जमिनीवर १००% अनुदान देवून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. तसेच योजना राबविताना भूमिहिन लोकांचा विचार करून त्यांना शासकीय जमिन उपलब्ध करून द्यावी. व ही योजना राबविताना भूमिहीन लोकांचाही सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावा.

२. दुग्धविकास, दुग्धव्यवसाय योजनेचा सहभाग :-

दुग्धविकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या योजना अत्यंत यशस्वी होत आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये गवताचे विक्रमी उत्पादन होत असताना जनावरांसाठी चारा व पाणी ही समस्या फसवी वाटते. यासाठी लाभधारकांचे मत परिवर्तन करून त्यांना या योजनांचा लाभ देण्याचे प्रयोग यशस्वी करून दाखवावेत व त्यानंतर दुग्धविकासाच्या योजना देण्यात याव्यात. दुग्धविकास या विभागामार्फत या योजना राबविण्याच्या प्रयत्नांना विशेष महत्व देण्यात यावे.

३. मार्गदर्शन व तांत्रीक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन:-

अ. आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या ग्रामसेवकांना व आदिवासी युवकांना प्रशिक्षण देण्यात यावे.

ब. कृषी विभागामार्फत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन प्रशिक्षण देण्यात यावे. यामध्ये अधिक उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक पध्दतीची शेती, तांत्रीक अवजारे वापरण्याची पध्दती सुधारीत बि - बियाणे, खते व किटकनाशके, जनावरांना होणारे आजार व त्यावर उपाययोजना या संदर्भातील महत्वपूर्ण मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दाखविण्यात यावीत.

क. लाभार्थींना वस्तू स्वरूपात लाभ दिल्यानंतर उदा. शेळीपालन, बैलगाडी, गोबरगॅस, बेंजोपार्टी, चमचा पॉलीश, बायोगॅस, खते इ. वस्तू वापराविषयीचे तांत्रीक मार्गदर्शन संबंधीत विभागामार्फत योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यानी करावे.

म्हणजे वस्तू वापरात येवून उत्पादन वाढेल व वस्तू स्वरूपात दिलेल्या लाभाचा दुरूपयोग होणार नाही.

४. जमिनीच्या कागद पत्रांचे सुसुत्रीकरण :-

ग्रामीण भागातही हळूहळू विभक्त कुटूंबपध्दती येत आहे. वडिलोपार्जीत जमिन पित्याच्या नावावर असते. यामुळे जमिनीचे धारण क्षेत्र जास्त दिसून येते. योजनांचा लाभ घेताना पित्याच्या नावावरील जमिनीचे कागदपत्र उपयोगी पडत नाहीत. किंवा धारण क्षेत्र जास्त दिसून येते. त्यामूळे लाभधारक लाभ घेण्याचा निष्कर्ष पूर्ण करू शकत नाही.

पर्यायाने लाभ घेण्यापासून वंचित राहतो. यासाठी आदिवासी शेतकऱ्याचे जमिनीचे पिता व पुत्रांच्या इच्छेनुसार खाते फोड करण्यात यावी. यासाठी महसूल विभागाकडून आवश्यक ते प्रयत्न व्हावेत.

५. दारिद्रय रेषेखालील लाभधारकांच्या यादीचे नूतनीकरण :-

विभक्त झालेली कुटूंबे तसेच नविन आदिवासी कुटूंबे यांचे उत्पन्न कमी असलयाने व स्वत:च्या नावावर जमिन नसल्याने दारिद्रय रेषेखालील गटात येतात. परंतू अशा कुटूंबांचा समावेश दारिद्रय रेषेखालील यादित नसतो.

यासाठी दर दोन वर्षानी पाहणीकरुन अशा कुटूंबांना दारिद्रय रेषेखालील गटात सामावून घेण्यात यावे.

याउलट ज्या लाभधारकांना योजना देवून त्यांचे उत्पन्न वाढले आहे व दारिद्रय रेषेची मर्यादा ओलांडून वर आले आहेत अशा लाभधारकांची नांवे दारिद्रय रेषेच्या यादितून कमी करण्यात यावीत.

६. योजनांची वारंवारीता टाळणे आवश्यक :-

एकाच गावामध्ये शिलाईमशिन, बेंजोपार्टी, रिपेकर व मंडप, किराणा दुकान यासारख्या औद्योगीक लाभाच्या योजना दोन लाभधारकांपेक्षा अधिक लाभधारकांना दिल्याने कोणाचाच व्यवसाय नीट चालत नाही. यासाठी योजनांचे वाटप करताना एकच योजना दोन पेक्षा अधिक लाभधारकांना दिली जात नाही ना याची खात्री/निश्चिती संबंधीत कार्यालयाकडून करण्यात यावी.

७. योजनांचे सुसूत्रीकरण :-

शिलाई मशीन, विहीर, विद्युत पंप, बैलगाडी, बैलजोडी या योजना आदिवासी विकास विभाग, कृषी विभाग व एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत वेगवेगळ्या पध्दतीने राबविली जाते. वरील सर्व विभागांमार्फत ही योजना सारख्याच पध्दतीने म्हणजे १००% अनुदान तत्वावर राबविण्यात यावी. तसेच विद्युत पंपाचे कनेक्शन त्वरीत जोडून मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्वरीत कार्यवाही व्हावी. व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला आदिवासी भागात आदिवासींच्या विद्युत पंपांना प्राधान्याने कनेक्शन देण्याबाबत आदेश द्यावेत.

८. योजनांची पडताळणी :-

कार्यान्वयन अधिकारी व बँकेचे अधिकारी यांचेकडून योजनांची पडताळणी होत नसल्याचे पाहणीत आढळले. यासाठी बँकेचे अधिकारी व संबंधीत विभागाचे अधिकारी यांचेकडून वेळोवेळी लाभाची पडताळणी करण्यात यावी.

९. प्रशिक्षणाची गरज :-

एकात्मिक ग्रामीण विकास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेली शेळी गट पालन योजना ही पूर्णपणे अयशस्वी लेली योजना आहे. याबाबत असे सुचवावेसे वाटते की ही योजना बंद करण्यात यावी अन्यथा शेळी पालनासंबंधीचे योग्य शिक्षण अथवा मार्गदर्शन लाभधारकांना देण्यात यावे.

१०. *स्वयंरोजगारा* सारख्या योजनांना प्राधान्य :- सुतार काम, बुरूडकाम, वेतकाम, गवंडीकाम यासारख्या यंरोजगार मिळवून देणाऱ्या योजनांपासून लाभधारकांना निश्चित स्वरूपात उत्पन्न मिळते. यासाठी अशाप्रकारच्या जनांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

११. विकास कार्यक्रम योजनांना प्रसिध्दी :- विकास योजनांचा उद्देश आदिवासींना पटवून देण्याची गरज आहे.

सध्या हे कार्य केवळ ग्रामसेवकच करतात. यासाठी रेडिओ, दूरदर्शन संच यासारखी दृकश्राव्य प्रसार माध्यमे दिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये शासनाने मोफत पुरवावीत. या व्यतिरिक्त बसस्थानकावर, चावडीवर, बसगाड्यांवर विविध जनांची माहिती देणारी चित्रे, भित्तीपत्रके लावण्यात यावीत.

१२. साक्षरतेचा प्रसार :- आदिवासींमध्ये असलेले निरक्षरतेचे प्रमाण कमी करून साक्षरतेच्या प्रसारास शिक्षण भागामार्फत उत्तेजन देण्यात यावे.

त्यामुळे आदिवासी आपल्या हक्कांच्या बाबतीत अधिक जागरूक होतील. साक्षरतेच्या प्रसारामुळे शासनाच्या कास योजना कार्यक्रम समजण्यास व लाभ घेण्यास लाभधारक प्रवृत्त होतील.

१३. स्वयंसेवी संस्थेचा सहभाग :- स्वयेसेवी संस्थेचा व आदिवासी लाभार्थ्यांचा संबंध जवळचा असल्याने त्यांचे हाय्य घेतल्यास योजना चांगल्या रितिने राबविण्यास मदत होईल व याचा लाभ दुर्गम आदिवासी लाभार्थ्यांना सुध्दा होईल.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दारिद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी शासनाच्या विविध विभागांनी केलेले प्रयत्न व त्यांची फलश्रुती यांचे सखोल मूल्यमापन - ठाणे जिल्हा

प्रपत्र क. १ : लाभधारकांसाठी प्रश्नावली.

१. तालुका ---------------------- गांव ---------------------- वाडा/वाडी --------

२. लाभार्थ्यांची माहिती

२.१ लभार्थ्यांचे नांव :- ------------------------------------------

२.२ वय ----------वर्षे ---------- २.३ जमातीचे नांव --------------

२.४ मदत मिळण्यापूर्वी कुटूंबांचा व्यवसाय --------------------------------

२.५ लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय -------------------------------------

२.६ लाभार्थ्यांचा दुय्यम व्यवसाय ------------------------------------

व्यवसाय संकेतांक - १ - शेती, २ - शेतमजूरी, ३ - नोकरी, ४ - घरगुती उद्योग, ५ - कुटिरोद्योग, ६ - अन्य.

२.७ कुटूंबांतील एकूण व्यक्तींची संख्या

| | | |
|---|---|---|
| प्रौढ | पुरूष | |
| | स्त्रिया | |
| १८ वर्षाखालील | मुले | |
| | मुली | |

३.० शेतीविषयक

३.१ लाभार्थी जमीन कसतो काय ? :- ( १ - होय ० - नाही )

कसत असल्यास जमिनीचे क्षेत्र :-
(एकर)

| | |
|---|---|
| कोरडवाहू | |
| बागायत | |
| पडीक | |
| एकूण | |

३.२ शेतीसाठी पाण्याची सोय :-

| अ.क्र. | पाण्याची सोय | ० - नाही<br>१ - होय | किती वर्षापासून आहे? |
|---|---|---|---|
| १. | विहिर | | |
| २. | तलाव | | |
| ३. | नदी | | |
| ४. | धरण | | |
| ५. | कॅनॉल | | |
| ६. | अन्य मार्ग | | |
| ७. | सोय नाही | | |

४. लाभधारक कुटूंबाचे उत्पन्न :-

| अ.क्र. | उत्पन्नाचे साधन | वार्षिक उत्पन्न | रूपयांत |
|---|---|---|---|
| १. | स्वत:च्या शेतजमिनीपासून<br>मिळणारे उत्पन्न | | |
| २. | कुटूंबातील व्यक्तींच्या रोजंदारीतून<br>मिळणारे उत्पन्न<br>( मिळणारा रोज रू. ---------)<br><br>( रोजंदारीवर जाणाऱ्यांची संख्या -------------) | | |
| ३. | घरगुती उद्योगांपासून मिळणारे उत्पन्न<br>(उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय<br>सरपण, मोळी विक्री वगैरे ) | | |
| ४. | छोट्या उद्योगापासून मिळणारे उत्पन्न<br>(उदा. पानपट्टी, लावूडस्पिकर, बैलगाडी<br>भाड्याने घेणे व तत्सम ) | | |
| ५. | घरातील/कुटूंबातील नोकरी करणाऱ्या<br>सभासदाकडून मिळणारे उत्पन्न<br>(नोकरी करणाऱ्या व्यक्तींची संख्या ------- )<br><br>(त्यांचे वार्षिक उत्पन्न रू. ----------------) | | |
| | एकूण वार्षिक उत्पन्न | | |

५. योजने संबंधी माहिती : (सन १९९० पासून)

| अ.क्र. | प्रमुख योजना | योजनेचे स्वरुप | कर्ज रुपये मंजूर | कर्जातील घेतलेली उचल | अनुदान १-१०० २-५० ३.३३ | कोणत्या बँकेतर्फे योजनेचा घेतला | देखभाल खर्च | योजनेची माहिती | तांत्रिक सल्ला मार्गदर्शन प्रशिक्षण | तांत्रिक सल्ला मार्गदर्शन प्रशिक्षण | लाभ घेतांना अडचणी | विमा उतरवला आहे ० - नाही १ - आहे | या योजनचा पूर्णपणे लाभ मिळाला ० - नाही १ - आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १. | पाटबंधारे व पूरनियंत्रण | | | | | | | | | | | | |
| २. | एकात्मिक ग्रामीण विकास योजना | | | | | | | | | | | | |
| ३. | न्युक्लिअस बजेट | | | | | | | | | | | | |
| ४. | कृषी व संलग्न सेवा | | | | | | | | | | | | |
| ५. | रस्ते व पूल | | | | | | | | | | | | |
| ६. | विद्युत विकास | | | | | | | | | | | | |
| ७. | सामाजिक व सामुहिक सेवा | | | | | | | | | | | | |

५.१ लाभ मिळण्यापूर्वी तुमचे वार्षिक उत्पन्न :- रू. -----------------

५.२ लाभ मिळाल्यानंतरचे तुमचे :- रू. -----------------
उत्पन्न किती रूपयांनी वाढले? :-
(वाढ झाली नसल्यास ० लिहावे ) :- अपेक्षित वाढ झाली नसल्यास कारणे

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

५.३ लाभ घेतलेला वस्तू सुस्थितीत :- (१ होय, ० नाही )
आहे का ?

| अ.क्र. | कारणे | १ - होय, ० - नाही |
|---|---|---|
| १. | कमी उत्पन्न मिळाले | |
| २. | सदोष आहे | |
| ३. | देखभालीचा खर्च जास्त आहे | |
| ४. | तातडीची गरज | |
| ५. | वस्तु सध्या अस्तित्वात नाही | |
| ६. | वस्तु/नग नाश पावली | |
| ७. | वस्तु/नग विकून टाकली | |
| ८. | वस्तु/नग गहाण ठेवली आहे | |

-----------------------------------------------------------------------------

| | | | |
|---|---|---|---|
| ५.४ | लाभ घेतलेला वस्तु तुमचेकडे अस्तित्वात आहे का ? | :- | (१ - होय, ० - नाही ) |
| | नसल्यास कारणे | :- | ------------------------------ |
| | | | ------------------------------ |
| | | | ------------------------------ |
| ६.० | कर्ज परतफेड | | |
| ६.१ | कर्ज पासबुक दिले आहे ? | :- | १ - होय, ० - नाही |
| | अ. जर दिले असेल तर पुस्तक भरल्याची शेवटची तारीख | :- | ------------------------------ |
| | ब. हप्त्यांची संख्या | :- | ------------------------------ |
| | क. काही परतफेड केली आहे की ? | :- | १ - होय ० - नाही |
| | ड. परतफेड केलेली रक्कम | :- | रू. -------------------- |
| ६.२ | लाभार्थी थकबाकीदार आहे का ? | :- | १ - होय ० - नाही |
| | असल्यास कारणे - | | |

| अ.क्र. | कारणे | १ - होय | ० - नाही |
|---|---|---|---|
| १. | उत्पन्न निर्माण होण्यास विलंब | | |
| २-२. | अपूरे उत्पन्न मिळते | | |
| ३. | वस्तुपासून उत्पादनात/उत्पन्नात मदत झाली नाही. | | |
| ४. | अर्धवट लाभ मिळाला. पर्यायाने उत्पन्न मिळाले नाही. | | |

------------------------------------------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| ७.० | अधिकाऱ्यांच्या स्थान भैटी | :- |
| ७.१ | योजना राबविणाऱ्या अधिकारयांच्या भेटी व मार्गदर्शन | :- |
| १. | भेट दिली व मार्गदर्शन केले | |
| २. | भेट दिली व मार्गदर्शन केले नाही | |
| ३. | भेट दिली नाही | |
| ७.२ | भेट दिली व मार्गदर्शन केले त्यावेळी त्यांनी | :------------------------------------<br>-------------------------------------<br>------------------------------------- |
| ७.३ | सदर सूचनांचे तुम्ही पालन केले आहे काय ? | :- १ - होय ० - नाही |
| ७.४ | सदर सूचनानुसार तुम्ही कोणते बदल केले ? | :------------------------------------<br>------------------------------------- |
| ७.४ | सदर सूचनानुसार तुम्ही कोणते बदल केले ? | :------------------------------------<br>-------------------------------------<br>-------------------------------------<br>------------------------------------- |

मुलाखत घेणाऱ्याचे मत :- -------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

मुलाखत घेणाऱ्याची सही लाभार्थ्याची सही/अंगठा

मुलाखत घेणाऱ्याचे नांव

मुलाखत दिनांक :-

५)    योजनेसंबंधि माहिती :- सन १९९० पासून

योजनेचे स्वरूप संकेतांक (रकाना ३) : १ - रोख रक्कम, २ - वस्तु, ३ - सेवा, ४ - रोख रक्कम व वस्तु, ५ - रोख रक्कम व सेवा, ६ - वस्तु व सेवा

बँक संकेतांक ( रकाना ७ ) : १ - सहकारी बँक, २ - शेड्यूल्ड बँक, ३ - राष्ट्रीयकृत बँक.

योजनेची माहिती (रकाना ९ ) : १ - ग्रामसेवक, २ - सरपंच, ३ - स्थानिक पुढारी/कार्यकर्ते, ४ - शासकीय कार्यालय, ५ - गावातील लोक, ६ - अन्य.

तांत्रिक मार्गदर्शन (रकाना १० ) : ० - मिळाले नाही, १ - मिळाले.

तांत्रिक प्रशिक्षण (रकाना ११ ) : १ - संबंधित अधिकाऱ्यांनी दिले, २ - बँकेच्या अधिकाऱ्यांनी दिले.

लाभ घेताना अडचणी (रकाना १२ ) : ० - अडचणी आल्या नाहीत, १ - अडचणी आल्या व अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला.

२ - अडचणी आल्या व अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला नाही.

३ - अडचणी आल्या व सल्ला मागूनही मिळाला नाही.

---

दारीद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थींना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी शासनाच्या विविध विभागांनी केलेले प्रयत्न व त्यांची फलश्रुती यांचे सखोल मुल्यमापन, जि. ठाणे.

---

प्रपत्र क्र. २ : कार्यान्वयन अधिकारी यांचेसाठी प्रश्नावली

चौक क्र. १ : प्रास्ताविक माहिती

१. अधिकाऱ्याचे नांव :

२. हुद्दा/पद :

३. मुख्यालय :

४. किती वर्षापासून आपण आदिवासी उपयोजना
क्षेत्रात काम करीत आहात : ----------- वर्षे

५. कोणत्या पातळीवर : ग्राम/तालुका/जिल्हा/राज्य

चौक क्र. २ : योजनांविषयी माहिती

६.आपल्या कार्यालयाकडून आदिवासी उपयोजना अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती खालील तक्त्यात भरा.

| अ.क्र. | पाटबंधारे व पूर नियंत्रण | | | कृषी व संलग्न सेवा | | | न्यु. बजेट | | | आय.आर.डी.पी. | | | रस्ते व पूल | | | विद्यूत पुरवठा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उप योजना | गांव | लोकसंख्या | उप योजना | गांव | लोकसंख्या | उप योजना | गांव | लोकसंख्या | उप योजना | गांव | लोकसंख्या | उप योजना | गांव | लोकसंख्या | उप योजना | गांव | लोकसंख्या |

७. मोठ्या स्वरूपातील लाभाचा : होय/नाही
विमा उतरविला जातो का?
कर्ज परत फेड :-
८. लाभधारकांना कर्ज पासबुक : होय/नाही.
दिले जाते का ?
९. हप्त्यांची संख्या नाबार्ड : होय/नाही.
निकषाप्रमाणे आहे का ?
१०. लाभधारक कर्जाचे : होय/नाही.
थकबाकीदार राहतात का ?
११. थकबाकीदार राहण्याची कारणे :
१२. लाभ मिळूनही लाभधारकाच्या उत्पन्नात
वाढ न होण्याची कारणे काय असावित ? :
१३. लाभ दिल्यानंतर आपण लाभार्थींच्या घरी
जावून दिलेल्या लाभाची पाहणी करता काय ? : होय/नाही.
साधारण किती टक्के लाभार्थींची पाहणी करता ? : संख्या/टक्केवारी
अ. व त्या संदर्भात सुचना देता काय ? : होय/नाही.
ब. अर्ज मिळाल्यापासून लाभ हातात
पडावयास किती दिवस लागतात ?
क. लाभधारकांना लाभ हातात मिळण्यास
उशिर होत असल्यास कारणे द्या.
१४. वरील योजनांमुळे आदिवासींच्या कौटुंबिक
परिस्थितीत काही बदल झाला काय ? : होय/नाही.
१५. आपण राबवित असलेल्या कोणत्या योजनांना
आदिवासींकडून जास्त प्रतिसाद मिळतो ?
जास्त प्रतिसाद मिळण्याची कारणे : १.
२.
३.
१५. कोणत्या योजनांना चांगला प्रतिसाद मिळत नाही ? :
त्यांची कारणे : १.
२.

१६. शासकीय योजना आदिवासींना अधिक उपयुक्त होण्यासाठी योजनेत आपणास काय बदल सुचवावेसे वाटतात ?

१७. आदिवासी उपयोजनेअंतर्गत विविध योजना अधिक यशस्वी होण्याच्या दृष्टीने आदिवासींचा सहभाग अधिक कसा घडवून आणता येईल ?

१८. विशेष सुचना :

ठिकाण :

दिनांक :

कार्यान्वयन अधिकाऱ्यांची
स्वाक्षरी